www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक ११५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, १४ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



अधिक माहिती - पान ३

## थोडक्यात

### महापालिकेची आपत्कालीन स्थितीत १४ गावांत धाव!

● नवी मुंबई, धनश्री सट्टा :



नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १४ गावांच्या सहभागावरून व विकासकामांसाठी आगामी काळात लागणाऱ्या खर्चावरून विविध राजकीय पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत असल्याचे चित्र असले तरी १४ गावांमध्ये आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास नवी मुंबई महापालिकेलाच धाव घ्यावी लागणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. चौदा गावांना सहभागी करण्याच्या निर्णयावर 'तू-तू मैं-मैं' रंगले असले तरी आपत्कालीन स्थितीत महापालिकेला जबाबदारी झटकता येणार नाही. वगळलेली १४ गावे पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करण्यात आल्याचा निर्णय २२ मार्च २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला होता. या गावांना पुन्हा नवी मुंबईत सामावून घेतले असल्याने आमदार गणेश नाईक व शिवसेना शिंदे गट, उद्धव गट यांच्याकडून वादंग रंगल्याचे समोर आले आहे.ग्रामविकास विभागाच्या मार्फतच हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती १४ गावांच्याबाबत जबाबदारी असलेले परिमंडळ उपायुक्त भागवत डोईफोडे यांनी दिली आहे.

### 'देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातला सर्वात..., - मनोज जरांगे पाटील

● शिरूर, अभिजित येरल्लू :

देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात आमदार उभे केले आहेत. ही त्यांची चाल आहे. मराठा का संपवायला निघाला आहात? १०६ आमदार मराठ्यांनी निवडून दिले आहेत. आम्ही आमचे आरक्षण मागत आहोत. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातला सर्वात भित्रा प्राणी आहे, अशी टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली आहे. शिरूर मतदार संघातील पिंपळवंडी येथील घोंगडी बैठकीतून ते बोलत होते. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही ही सर्वांची इच्छा आहे. हा समाज बलाढ्य आहे. समाज प्रगत होईल म्हणून आरक्षण मिळू द्यायचं नाही. अनेक जणांनी देव पाण्यात ठेवले आहेत. राजकीय पक्षातील लोक आपल्यात फूट पाडत आहेत. फूट पडण्यासाठी सरकारने आंदोलन उभे केले असल्याची टीका त्यांनी केली आहे. निवडणुका जवळ आल्या आहेत. त्यामुळे भावनिक केलं जाणार आहे.

# उपराष्ट्रपती यांच्या हस्ते संविधान मंदिराचे लोकार्पण

## प्रधानमंत्र्यांच्या हस्ते कौशल्य विकास विभागाच्या योजनांचा प्रारंभ - कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा




● मुंबई, विशाल कारंडे :

कौशल्य विकास विभागामार्फत राज्यातील ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये 'संविधान मंदिर लोकार्पण ' हा कार्यक्रम उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते १५ सप्टेंबर रोजी होणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातील एक हजार महाविद्यालयांमध्ये 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र शुभारंभ' आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना शुभारंभ' प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते दि. २० सप्टेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री श्री.लोढा बोलत होते.

पान २ वर

### संविधान मंदिर लोकार्पण सोहळा

■ राज्यातील ४३४ आयटीआयमध्ये जागतिक लोकशाही दिनाच्या संविधान मंदिर लोकार्पण कार्यक्रम उपराष्ट्रपती जगदीप धनखड व राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत रविवार १५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता एल्फिन्स्टन तांत्रिक महाविद्यालय येथे होणार आहे.प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या भारतीय संविधानाची शिकवण देण्यात येणार असून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजच्या पिढीला माहिती व्हावे यासाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

### स्टार्टअप योजना शुभारंभ कार्यक्रम

■ राज्यातील १००० महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना शुभारंभ कार्यक्रम प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते वर्धा येथे २० सप्टेंबर रोजी होणार आहे.या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय उद्योगमंत्री जीतन राम मांझी,केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,वने मंत्री सुधीर मुनगंटीवार,उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा हे उपस्थित राहणार आहेत.

### आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना

“ नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व आलेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीतंर्गत “आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र” ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. एक हजार नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण राज्यात १५ ते ४५ वयोगटातील दरवर्षी साधारण १ लाख ५० हजार युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण संपूर्णपणे मोफत असून या योजनेसाठीचा सर्व खर्च कौशल्य विकास विभाग करणार आहे.

## देशातील पहिली वंदे भारत मेट्रो गुजरातमध्ये धावणार



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

देशातील रेल्वे नेटवर्कला आधुनिक बनवण्यासाठी आणि प्रवाशांना आरामदायी प्रवासाची सेवा देण्यासाठी वंदे भारत एक्स्प्रेस सुरु करण्यात आल्या आहेत. आता पहिली वंदे भारत मेट्रो ट्रेन सुरु होणार आहे. रेल्वे मंत्रालयानं यासंदर्भातील वेळापत्रक जारी केलं आहे. पहिली वंदे भारत मेट्रो ट्रेन भुज ते अहमदाबाद दरम्यान धावेल. ही रेल्वे आठवड्यातून ६ दिवस चालणार आहे. भुजमध्ये रविवारी तर अहमदाबादकडून शनिवारी ही सेवा बंद राहील. देशातील पहिली वंदे भारत मेट्रो गुजरातच्या भुज पासून अहमदाबादपर्यंत चालवली जाणार आहे. या मध्ये अंजार, गाधीधाम, भचाऊ, समखियाली, हलवद, ध्रांगध्रा, विरमगाम, चांदलोडिया आणि साबरमतीला थांबेल.

पान २ वर

## सौर कृषिपंपांतून शेतकऱ्यांना वीज विक्रीचे उत्पन्न मिळवून देणार - मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



● मुंबई, यश सावंत :

कृषिपंपाच्या वीज कनेक्शनसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहण्यापासून मागणीनुसार तत्काळ कृषिपंप अशी राज्याची वाटचाल 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'मुळे झाली आहे. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे प्रतिपादन मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले.मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या वेबसाईटचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झाले, त्यावेळी ते बोलत होते. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे व पोस्टरचे प्रकाशनही त्यांनी केले.

पान २ वर

## एसटी 9 वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर

● मुंबई, विशाल पाटील :



गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करणारी एसटी ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर धावू लागली आहे. आर्थिक संकटामध्ये रूतलेल्या एसटीने आता भरारी घेतली असून महामंडळाची आर्थिक घोडदौड सुरू झाली आहे. ऑगस्ट महिन्यात ३१ विभागांपैकी २० विभागांनी नफा कमवला आहे. या महिन्यात एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये इतका नफा झालेला आहे. तब्बल ९ वर्षांनी एसटी महामंडळ नफ्यात आल्याने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करीत भविष्यातही प्रयत्नांची पराकाष्टा करून महामंडळ सातत्याने नफ्यात येईल, असे प्रयत्न करण्याचे आवाहनही केले आहे.

पान २ वर

## फिनलँड संसदीय शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

### विद्यापीठांमध्ये सहकार्य वाढविण्यावर चर्चा



● मुंबई, विशाल कारंडे :

भारत भेटीवर आलेल्या फिनलँड संसदेच्या वाणिज्य विषयक समितीच्या सदस्यांनी गुरुवारी (दि. १२) समितीचे अध्यक्ष सकारी पिस्टो यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठांचे कुलगुरू देखील उपस्थित होते. फिनलँडचे मुंबईतील वाणिज्यदूत एरिक एफ हॉलस्ट्रॉम देखील उपस्थित होते. भारत व फिनलँड आपल्या राजनैतिक संबंधांच्या स्थापनेचे ७५ वर्षे साजरे करीत आहेत. बैठकीत महाराष्ट्र व फिनलँड मधील विद्यापीठांमध्ये शैक्षणिक सहकार्य, विशेषतः विद्यार्थी - शिक्षक आदान प्रदान, संशोधन, सामायिक सत्र, कौशल्य विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल आदी विषयांवर चर्चा झाली.

## देवेंद्र फडणवीसांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती: एकनाथ खडसे

● मुंबई, विशाल पाटील :



देवेंद्र फडणवीसांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट एकनाथ खडसे यांनी केला आहे. फडणवीसांनी मनापासून प्रयत्न करेन असं सांगितलं होतं. फडणवीसांनी मुलीची शपथ घेऊन आश्वासन दिलं होतं, असे देखील एकनाथ खडसे म्हणाले. दिल्लीतल्या अतिज्येष्ठ नेत्यांनी मला फोन केल्यानं भाजप प्रवेशाचा निर्णय घेतल्याचं देखील एकनाथ खडसेंनी “माझा कट्टा” कार्यक्रमात सांगितलंय.

एकनाथ खडसे म्हणाले, मला एक दिवशी देवेंद्र फडणवीसांनी बोलवले. तुम्ही म्हणता ना पंकजाला न्याय झाला तसाच न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यावेळी आम्ही दोघेच होते. देवेंद्र फडणवीस मला म्हणाले, नाथाभाऊ तुमची मी राज्यपालपदासाठी शिफारस करतो. त्यावर मी म्हणालो, देवेंद्रजी खरं सांगा, तुम्ही मला अनेकदा सांगितलं की हे करणार, ते देणार ते काही झालं नाही त्यामुळे माझा विश्वास बसत नाही. मी म्हटलो राज्यपाल केले तर आनंदाची गोष्ट आहे, पण माझा विश्वास बसत नाही. ते म्हणाले, माझ्या एकुलत्या एक मुलीची शपथ घेऊन सांगतो हा देवेंद्र फडणवीसचा शब्द आहे. पुढे काय झालं मला माहीत नाही पण देवेंद्र फडणवीसांनी मला आश्वासन दिले होते.

पान २ वर

# अजित पवारांचे परतीचे सर्व दोर कापले

## शरद पवार गटातील नेत्याचं महत्त्वपूर्ण वक्तव्य

● बारामती, नितीन देवळेकर :



गेल्या काही दिवसांत अजित पवार यांची बदललेली भाषा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात अजित पवार यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यावर जोरदार टीका केली होती. बारामती लोकसभेची लढाई कोणत्याही परिस्थितीत जिंकायची असा चंग बांधलेल्या अजित पवार यांनी मागचा पुढचा कोणताही विचार न करता आपल्या घरातील लोकांनाच अंगावर घेतले होते. परंतु, अलीकडच्या काळात अजित पवार यांची शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याविषयी भाषा कमालीची मवाळ झाली आहे. एवढेच नव्हे तर अजित पवार यांना आपल्या चुकांची उपरतीही झाली आहे. त्यामुळे अजित पवार पुन्हा घरवापसीच्या तयारीत आहेत का, अशी कुजबुज सुरु झाली होती. मात्र, शरद पवार गटातील एका ज्येष्ठ नेत्याने अजित पवार यांचे परतीचे सर्व दोर कापले गेले असल्याचे वक्तव्य केले आहे.

शरद पवार गटातील नेत्याने अजितदादांविषयी केलेल्या या वक्तव्यावरुन सध्या अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. शरद पवार गटातील या नेत्याने म्हटले की, अजित पवार यांना आता शरद पवार गटात येण्यास एन्ट्री नाही. विधानसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात शरद पवार गटाचाच उमेदवार विजयी होईल. अजित पवार यांना आता शरद पवार गटात स्थान नाही, असे या नेत्याने म्हटले. त्यामुळे अजित पवार यांचे घरवापसीचे सर्व दोर कापले गेल्याचे तुर्तास दिसत आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अजित पवार यांच्या मनातील घराण्याविषयीची माया पुन्हा जागृत झाली होती. मी राजकारण घरापर्यंत न्यायला नव्हते पाहिजे. मी माझ्या पत्नीला बहिणीवरोधात रिंगणात उतरवून चूक केली, अशी कबुली अजित पवार यांनी दिली होती. यानंतर अनेक सभा आणि कार्यक्रमांमध्ये अजित पवार यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याविषयी भावनिक उद्गारही काढले होते. त्यामुळे अजित पवार हे पुन्हा माघारी परतण्याच्या तयारीत आहेत का, अशा चर्चेला ऊत आला होता. अजित पवार त्याचदृष्टीने भावनिक वक्तव्यं करुन पायाभरणी करत आहेत का, अशा शंका निर्माण केल्या जात होत्या. मात्र, शरद पवार गटातील ज्येष्ठ नेत्याने आता अजितदादांना आमच्या पक्षात स्थान नाही, असे स्पष्ट सांगून सर्व चर्चांना तुर्तास पूर्णविराम दिला आहे.

## धारावी पुनर्वसन प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा छुप्या पद्धतीने उरकण्याची वेळ

● मुंबई, यश सावंत :



धारावी पुनर्वसन प्रकल्पाचा काल अगदी छुप्या पद्धतीने भूमिपूजन सोहळा आरपीएफ ग्राऊंडवर पार पडला. धारावी पुनर्वसन प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने सकाळी धारावी लेबर कँपजवळील रेल्वेच्या ग्राऊंडवर हा सोहळा पार पडला. याला जोरदार विरोध होण्याची शक्यता असल्याने गुरुवारी भल्या पहाटे इतक्या महत्त्वाच्या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा पार पडल्याने विरोधकांनी जोरदार टीका सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणाचा मुहूर्त साधून धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रा. लि. ने गुरुवारी सकाळी माटुंगा येथील RPF मैदानावर धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा पार पाडला.सेक्टर ६ या भागात झालेल्या या भूमिपूजनाने रेल्वे कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आणि कार्यालये उभारण्याच्या कामाचाही शुभारंभ झाला. धारावी पुनर्विकासाच्या निविदेनुसार, ही रेल्वे कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आणि कार्यालये सरकारकडे हस्तांतरित केली जाणार आहेत. खऱ्या अर्थाने या ऐतिहासिक घडामोडीसह, धारावी पुनर्विकास प्रकल्पाने आधुनिक धारावीच्या निर्मितीमध्ये मोठे पाऊल उचलले आहे. जे भविष्यात धारावीकरांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा घडवून आणेल. पुनर्विकासाची गती वाढवण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करण्यासाठी सध्या राज्य सरकार धारावीत घरोघरी जाऊन पात्र आणि अपात्र रहिवाशांचं सर्वेक्षण करत आहे.

पान २ वर

## संपादकीय

# हरियाणात दोलायमान स्थिती

हरियाणात भाजपने 67 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आणि भाजपच्या 25 पेक्षा जास्त मातब्बर नेत्यांनी बंडाचे निशाण फडकविले. हरियाणात बंडखोरी करणार्या या नेत्यांमध्ये राज्य मंत्रिमंडळातील सदस्यांचा समावेश आहे. आतापर्यंत भाजपच्या ज्या 25-30 नेत्यांनी बंडाचे निशाण फडकविले आहे त्यात हरियाणा सरकारचे मंत्री रणजीत सिंह चौटाला, आदित्य चौटाला, दर्शन गिरी महाराज, पंडित जी. एल. शर्मा, लक्ष्मण दास नापा आणि करणदेव कंबोज यांच्यासारख्या दिग्गजांचा समावेश आहे. काँग्रेस पहिल्या यादीत 31 उमेदवारांची नावे जाहीर केली; परंतु भाजपसारखी अफरातफर काँग्रेसमध्ये असल्याचे सध्यातरी दिसून येत नाही. भाजप सोडून जाणारे काही नेते काँग्रेसमध्ये सामील होणार असल्याची चर्चा आहे. काहींनी स्वबळावर निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. यामुळे भाजपच्या अडचणी वाढण्याची शक्यता बळावली आहे. भाजप सोडून गेलेल्या नेत्यांच्या मुद्दयावर बोलायला भाजपचा कोणताही नेता तयार नाही. मात्र, या बंडखोरीमुळे होणारे नुकसान कसे कमी करता येईल यासाठी पक्षाकडून प्रयत्न केले जात आहे.

लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस नेते नवीन जिंदाल आणि त्यांची आई सावित्री जिंदाल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. देशातील काही मोजक्या बड्या उद्योगपतींपैकी एक गळाला लागल्यामुळे भाजपात आनंदाचे वातावरण होते. मात्र, भाजपने सावित्री जिंदाल यांना तिकीट नाकारले. यामुळे पक्षाला मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सावित्री जिंदाल यांनी त्यांच्या समर्थकांना स्वतंत्रपणे मैदानात उतरण्यास सांगितले आहे. याचाही भाजपला मोठा फटका बसणार आहे. निवडणुकीपूर्वी तिकीट न मिळाल्यामुळे

नेत्यांनी पक्ष सोडून जाणे ही एक सामान्य बाब असल्याचे भाजपकडून सांगितले जात आहे. तिकीट न मिळाल्यामुळे पक्ष सोडून जाण्याचा प्रकार फक्त भाजपातच घडत आहे असे अजिबात नाही. हा प्रकार सर्व राजकीय पक्षांमध्ये घडत असतो, असा दावासुद्धा भाजपकडून केला जात आहे. काँग्रेसची पहिली यादी जाहीर झाल्यानंतर काँग्रेसमध्येसुद्धा पळापळीचे वातावरण बघायला मिळेल, असा भाजपचा दावा होता. मात्र, काँग्रेसची पहिली यादी जाहीर झाली आणि काँग्रेसमध्ये सर्व काही स्थिर असल्याचे दिसून येत आहे. भाजपने हरियाणातील प्रत्येक समाजाला प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला आहे. यात जाट, गैर-जाट, ब्राह्मण, बनिया, यादव, कुम्हार, कंबोज आणि राजपूत यांचा समावेश आहे. पहिल्या यादीत सर्वसाधारण प्रवर्गातील 40, ओबीसी 14 आणि अनुसूचित जातीच्या 13 उमेदवारांना तिकीट देण्यात आले आहे. सत्ताविरोधी लाटेचा सामना करण्याची भाजपची आपली एक पद्धत आहे. जुन्या चेहयांच्या ठिकाणी नवीन चेहरे देऊन सत्ताविरोधी लाट शमविण्याचा प्रयत्न केला जातो. यात भाजपला बर्यापैकी यशही मिळाले आहे. 4 सप्टेंबर रोजी जाहीर झालेल्या 67 उमेदवारांच्या पहिल्या यादीत पक्षाने 40 जागांवर उमेदवार बदलले आहेत. यामध्येही 27 उमेदवार पहिल्यांदाच निवडणूक लढणार आहेत.उमेदवार बदलल्याचा निवडणुकीत फायदा होणार असल्याचा दावा भाजपकडून कितीही केला जात असला तरी देशात आणि हरियाणातील 10 वर्षांच्या सत्तेविरूद्ध निर्माण झालेली लाट मानगुटीवर बसून आहे. जाट समुदाय सत्ताधारी पक्षावर नाराज आहे. हरियाणातील कुस्तीपटू महिला खेळाडूंसोबत दिल्लीत जे काही घडले त्यामुळे जनता आणखी नाराज झाली आहे. यात कहर म्हणजे शेतकयांची नाराजी नावालासुद्धा कमी झाली नाही. हरियाणातील लोकांमध्ये सरकारी नोकर्यांबद्दल खूप आकर्षण आहे.

मात्र, नोकयांची वानवा आहे. देशसेवेसाठी लष्करी सेवेत जाणार्या हरियाणाच्या तरुणांची संख्या भरपूर आहे. पण ज्याप्रकारे संपूर्ण देशात तरुणांची अग्निवीर योजनेबाबत नाराजी पुढे आली आहे त्याचा परिणाम हरियाणाच्या निवडणुकीत दिसून येऊ शकतो. दरम्यान, महागाईनेही जनजीवन कठीण झाले आहे. दरम्यान, परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी हरियाणात भाजपसाठी छुपी संधी आहे, असे भाजपला वाटते आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने भाजपला काट्याची टक्कर दिली होती. यानंतरही भाजपने पाच जागा जिंकल्या आणि जवळपास 50 टक्के मते मिळविली. विधानसभा निवडणुकीतही चुरशीची लढत होऊ शकते, असा भाजप नेत्यांचा अंदाज आहे, पण हे प्रकरण एकतर्फी अजिबात नाही. सध्या हरियाणाच एकमेव असे राज्य आहे जेथे भाजप आणि काँग्रेस यांच्यात थेट लढत आहे. ज्या ठिकाणी मुख्य लढत काँग्रेस आणि भाजपात होत असते तेव्हा राजकीय तज्ज्ञांच्या नजरासुद्धा या लढतीकडे वेगळ्या नजरेने पाहात असतात. कदाचित म्हणूनच, हरियाणा एक लहान राज्य असले तरी पंतप्रधान नेंद्र मोदी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी स्वतः या निवडणुकीकडे जातीने लक्ष देत आहेत. दोन्ही नेते आपापली रणनीती बनवत आहेत. काँग्रेससाठी हरियाणा जास्त महत्त्वाचा आहे. हरियाणाची सत्ता मिळाली तर मुख्यमंत्री काँग्रेसचा होणार आहे.



## आजची चित्रोळी

पाठीवरती बिर्‍हाड घेऊन
जगांत हा नांदे !
पकडीत जर याच्या आला
होतील मग वांदे !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### उपराष्ट्रपती यांच्या हस्ते संविधान...

यावेळी कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, राज्य नाविन्यता सोसायटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी विकास नाईक यावेळी उपस्थित होते.आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्लोक अहिल्यादेवी

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला स्टार्टअप्सना निधी तसेच आर्थिक पाठबळ देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेत राज्यातील महिला स्टार्टअप्सला स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविणे, देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे हा योजनेचा उद्देश आहे.या योजनेसाठी १०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून, सुमारे एक हजार स्टार्टअप्सना २५ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. मंत्री श्री.लोढा म्हणाले, "अनेक कौशल्य संपन्न आणि नीतिमंत व्यक्तिमत्वांनी आपल्या भारत देशाला घडवण्यासाठी आपले योगदान दिले. आज त्यांच्या मेहनतीमुळे आपण आजवर इतकी प्रगती करू शकलो आहोत. संविधान मंदिराच्या माध्यमातून संविधान निर्मितीचा इतिहास, त्याचे महत्व, येणा-या पिढीला समजावे हा आमचा प्रयत्न आहे. येणारा काळ हा युवाशक्तीचा आहे, भारतातील युवकांसाठी सुवर्ण संधींचा आहे. संविधान मंदिर आणि महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र उभे करण्यामागे आमचा हाच उद्देश आहे. नक्कीच युवकांचा त्याला चांगला प्रतिसाद मिळेल. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कार्यक्रमास येण्यासाठी आपला अमूल्य वेळ दिला, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो!"

### देशातील पहिली वंदे भारत मेट्रो गुजरातमध्ये...

अहमदाबादहून निघालेली वंदे भारत मेट्रो साबरमती, चांदलोडिया, विरमगाम, ध्रांगध्रा, हलवद, समखियाली, भचाऊ, गांधीधाम अंजार मार्गे भुजला पोहोचेल.

वंदे भारत मेट्रोचं वेळापत्रक

वंदे भारत मेट्रो ट्रेन सकाळी ५.०५ वाजता भुजहून रवाना होईल, अहमदाबादला सकाळी १०.५० ला पोहोचेल. त्यानंतर सायंकाळी ०५.३० वाजता सुटेल ती भुजला रात्री ११.१० वाजता पोहोचेल. वंदे भारत मेट्रो ट्रेन ९ स्थानकावर थांबेल. प्रत्येक स्थानकांवर वंदे भारत मेट्रो २ मिनिटं असेल. या ट्रेनला दोन्ही शहरांना जोडण्यास पावणे सहा तासांचा वेळ लागेल.

वंदे भारत एक्स्प्रेसचं दरपत्रक देखील जारी करण्यात आलं आहे. या मेट्रो ट्रेनच्या तिकिटाचा कमीत कमी दर ३० रुपये असेल, यावर जीएसटी देखील लागेल. ५० किलोमीटरच्या प्रवासाला ६० रुपये अधिक इतकं शुल्क लागेल. म्हणजेच एका किलोमीटरला १.२० रुपये लागतील.

वंदे भारत मेट्रो ट्रेनमध्ये एमएसटी म्हणजेच मासिक पास वैध असेल. मात्र, साधारण मेल आणि एक्स्प्रेस ट्रेन किंवा पॅसेंजर ट्रेनसाठी जारी केलेलं एमएसटी तिकीट चालणार नाही. यासाठी वेगळं एमएसटी तिकीट जारी केलं जाईल. साप्ताहिक, मासिक तिकीट उपलब्ध असेल. प्रवाशांना सात दिवस, १५ दिवस, २० दिवसांच्या एकेरी प्रवासाचं शुल्क भरावं लागेल.

रेल्वे मंत्रालयाच्या माहितीनुसार ही ट्रेन आठवड्यातून सहा दिवस सुरु राहील. एक दिवस ही ट्रेन सुरु राहणार नाही. वंदे भारत मेट्रो ट्रेनचे रेक रेल्वे मंत्रालयाच्या चेन्नईयेथील आयसीएफमध्ये बनवले आहेत. वंदे भारत मेट्रो ट्रेनची निर्मिती २०० किलोमीटर प्रति तास वेगानं धावेल, अशा प्रकारे करण्यात आलेली आहे. भुज-अहमदाबाद मार्गावर मेट्रोचा वेग १०० ते १५० किमी प्रति तास असेल. वंदे भारत मेट्रोमध्ये स्वयंचलित दरवाजे आहेत. यामुळं प्रवासी दारात उभे राहू शकत नाहीत.

### सौर कृषिपंपांतून शेतकऱ्यांना वीज विक्रीचे...

यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव श्रीकर परदेशी आणि एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक उपस्थित होते.

मा. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सौर कृषिपंपाच्या पॅनेल्समधून निर्माण होणारी अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये पाठवून वीज कंपन्यांना विकता येईल व त्यातून शेतकऱ्याला अतिरिक्त उत्पन्न मिळविता येईल, अशी योजना लागू करण्यात येईल. त्यामुळे शेतकरी हा वीजबिल भरणाऱ्याऐवजी वीज विकून उत्पन्न मिळविणारा होईल.

ते म्हणाले की, राज्यात २०१४ पूर्वी शेतकऱ्यांना पेड पेंडिंगची समस्या तीव्रतेने जाणवत होती. त्यानंतर आपल्या सरकारमध्ये शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यावर भर देण्यात आला. आता मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडीसह तत्काळ पंप मिळत आहेत. सौर कृषी पंपामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होत आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होत असल्याने तेवढा काळ वीजबिल येणार नाही. साडेसात एचपी पंपाचा विचार केला तर २५ वर्षांच्या कालावधीत त्या शेतकऱ्याचे वीजबिलाचे दहा लाख रुपये वाचणार आहेत. ही योजना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुसुम बी योजनेच्या आधारे लागू केली असून आपण मा. पंतप्रधानांचे आभार मानतो.

त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १२ हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे करार झाले आहेत. आगामी दोन वर्षात त्यातून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती सुरू होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी शंभर टक्के सौर ऊर्जा मिळेल. शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक हरित ऊर्जा मिळण्यासोबत अनुदान आणि क्रॉस सबसिडीचे पैसे वाचतील.

गेल्या अडीच वर्षातील कार्यकाळ हा राज्यातील ऊर्जा क्षेत्रासाठी टर्निंग पॉईंट ठरला आहे. या काळात तीनही वीज कंपन्यांनी मोलाची कामगिरी केली आहे, असे ते म्हणाले. मा. उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काही लाभार्थी शेतकऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. लाभार्थी शेतकरी या योजनेबद्दल समाधानी असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, मा. उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात गेल्या दोन वर्षात शेतकऱ्यांसाठी नवीकरणीय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येत आहे. एके काळी राज्यात साडे आठ लाख शेतकरी वीज कनेक्शनच्या प्रतीक्षेत होते पण आता पेड पेंडिंगची संख्या नगण्य झाली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे पेड पेंडिंगची समस्या इतिहास बनेल. या योजनेत आगामी तीन वर्षात राज्यात दहा लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. योजना सुरू झाल्यानंतर अल्पावधीत दोन लाख शेतकऱ्यांची निवड झाली असून त्यापैकी ४५ हजार शेतकऱ्यांच्या शेतात मागील सहा महिन्यात सौर कृषिपंप बसविले आहेत, हा एक विक्रम आहे. महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेश्मे यांनी आभार प्रदर्शन केले.

### एसटी ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर

मागील काळात दोन वर्ष कोरोना महामारी आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एस टी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. मे २०२२ पासून एसटीची सुरळीत वाहतूक सेवा सुरू झाली. तथापि, एसटीचा घटलेला प्रवासी पुन्हा एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य शासनाने २५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास व सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात २५ टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या, की ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. सध्या सरासरी ५४ लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत. याबरोबरच एसटी प्रशासनाने गेल्या वर्षभरात " हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान", विद्यार्थ्यांना शाळेत थेट पास, प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन, श्रावणात एसटी संगे तीर्थाटन, असे अनेक अभिनव उपक्रम राबविले. तसेच जे विभाग गेली कित्येक वर्ष तोट्यामध्ये आहेत, त्या विभागांना मार्गदर्शन करण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडून पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली. स्थानिक पातळीवर आगारनिहाय कर्मचारी व अधिकारी यांच्या बैठका घेण्यात आल्या. तोट्याच्या मार्गावरील बस फेऱ्या बंद करून, त्या ज्या मार्गावर प्रवासी जास्त आहेत तेथे वळविण्यात आल्या. याच बरोबर नादुरुस्ती बसेसचे प्रमाण १२ टक्क्यांवरुन ६ टक्के झाले. मागील वर्षाच्या तुलनेमध्ये ते निम्याने कमी करण्यात आले. तसेच चालक व यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे सातत्याने प्रबोधन करुन डिझेलची खपत ०.५२ कि.मी.ने वाढविण्यात आले. त्यामुळे डिझेलची बचत झाली आहे. या सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिपाक म्हणून ऑगस्ट महिन्यामध्ये एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार इतका नफा प्राप्त झालेला आहे.भविष्यात येऊ घातलेल्या स्व: मालकीच्या बसेस व भाडेतत्वावरील बसेस एसटीच्या ताफ्यात सामील झाल्यानंतर त्याचा योग्य विनियोग करुन एसटी महामंडळ सातत्याने फायद्यात राहील यासाठी कृतीशील आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी केली जाईल. जेणेकरुन एसटीला गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी व्यक्त केला आहे.

### देवेंद्र फडणवीसांनी मला राज्यपालपदाची ऑफर...

साधारण ही गोष्ट २०१९ सालातील आहे. ज्या वेळेस मी भारतीय जनता पक्षामध्ये जाण्याचा निर्णय घेतला त्यावेळी त्या कालखंडामध्ये माझी भाजपमध्ये जाण्याची इच्छा नव्हती. दिल्लीतल्या अतिज्येष्ठ नेत्यांनी मला फोन केला. दिल्लीत मी असताना जे.पी.नड्डा आणि विनोद तावडे यांच्या उपस्थितीत भाजप प्रवेश झाला. यावेळी रक्षा खडसेही उपस्थित होत्या. त्यावेळी त्यांनी माझ्या गळयात भाजपचा मफलर घातला. या घटनेला ५ ते ६ महिने होऊनही भाजपनं माझा प्रवेश झाल्याचं घोषित केलं नाही. अजून मी वाट पाहतोय पण अजून काही घोषणा झाली नाही. त्यामुळे यापुढे भाजपमध्ये जाण्याच्या मार्गावर आपण फुली मारलीय असंही खडसे म्हणालेत.

मी प्रवेश घेतो असं कधी म्हणालो नव्हतो. मला प्रवेश घ्या असे म्हणाले होते. त्यानंतर मी शरद पवार आणि जयंत पाटलांशी चर्चा करुन गेलो होतो. ४० वर्षे भाजपचे काम केले.इतके वर्ष काम केले, पक्षासाठी पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. इतकं सगळ करून भाजपमध्ये मला प्रवेश द्या ही विनंती करणे माझ्यासाठी अतिशय अपमानास्पद आहे.

### धारावी पुनर्वसन प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा...

राज्य सरकार आणि अदानी समूह यांच्यातील संयुक्त उपक्रम असलेल्या DRPPL ने सध्या एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. २०२३ पर्यंत मुंबईला झोपडपट्टीमुक्त शहर बनविण्याचं त्यांचं लक्ष्य आहे.

गुरुवारी, झालेल्या या भूमिपूजन सोहळयाचे महत्त्व हे केवळ धारावीच्या रहिवाशांसाठी आणि व्यवसायिकांपुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मुंबईसाठी महत्त्वाचे आहे. किमान १० लाख लोकांना मोठ्या, आधुनिक घरांसह उच्च दर्जाच्या सुविधा या पुनर्विकास प्रकल्पामुळे मिळणार आहेत. अशा सुविधांच्या लाभाला इथले लोक पिढ्यानपिढ्या मुकले होते.

या पुनर्विकासामुळे धारावीतील अनेक लघु उद्योगांना लाभ होईल. या लघुउद्योगांनी आपली स्वतःची अशी छोटेखानी अर्थव्यवस्था निर्माण केली आहे. परंतु, अपुऱ्या जागेअभावी त्यांना अत्यंत खराब स्थितीत राहून काम करावं लागतंय. DRPPLच्या सूत्रांनी सांगितल्यानुसार, हा भूमिपूजन सोहळा आधुनिक धारावी निर्माण करण्यासाठीच्यादृष्टीने टाकलेलं पहिलं पाऊल होतं. ते पुढे म्हणाले की, "आम्ही जगातील सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेल्या विभागाचा पुनर्विकास करतो आहोत. आम्ही धारावीकरांना 'key to key' म्हणजे थेट घराची चावी देण्याबद्दलच आश्वासित केले आहे. ज्यात विद्यमान रहिवाशांना तात्पुरत्या निवाराकेंद्रात स्थलांतरीत न करता निश्चित कालावधीत घरे देण्याची ग्वाही दिली आहे."

धारावी पुनर्विकास प्रकल्प भारताला जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या पुनर्वसनाच्या संदर्भात प्रमुख स्थान देईल. इथल्या रहिवाशांना ३५० चौ. फूट आधुनिक घरं दिली जातील. ज्यात स्वयंपाकघर आणि शौचालय असेल, आणि उच्च दर्जाच्या रस्ते, रुग्णालये, शाळा, उघड्या जागा इत्यादी सुविधा उपलब्ध असतील. या घरांचा आकार मुंबईतल्या अन्य कोणत्याही झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांपेक्षा 17% अधिक आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्प संपूर्ण देशातील सर्वात महत्वाचा पुनर्विकास प्रकल्प आहे. ज्यात अपात्र मानल्या गेलेल्या व्यक्तीला देखील घर मिळेल. या अपात्र रहिवाशांना दोन उपवर्गात विभागले गेले आहे. १ जानेवारी २००० ते १ जानेवारी २०११ दरम्यानच्या कालावधीतील रहिवाशांना मात्र परवडणाऱ्या किमतीत मालकीची घरं दिली जातील. २०११ नंतरच्या घरधारकांना राज्य सरकारच्या परवडणाऱ्या भाड्याच्या घरांच्या धोरणानुसार घरं दिली जातील. ज्यात भाड्याने घर घेऊन नंतर विकत घेण्याचा पर्याय असेल. या अपात्र रहिवाशांना मुंबईत इतरत्र तयार करण्यात येणाऱ्या आधुनिक शहरात स्थानांतरित केले जाईल. DRPPL च्या सूत्रांनी सांगितले की, "या नवीन शहरांमध्ये अत्याधुनिक सुविधांची पूर्तता केली जाईल. ज्यात शाळा, रुग्णालये, उद्याने आणि उत्तम रस्ते असतील."

सर्व पात्र आणि प्रदूषण न करणाऱ्या उद्योग आणि व्यावसायिकांचं धारावीमध्येच पुनर्वसन केलं जाणार आहे हे लक्षात घ्यायला हवं. याबद्दल राज्य सरकारच्या सूत्रांनी सांगितल्यानुसार, "DRPPL हे रोजगार आणि स्थानिक व्यवसायांचे संरक्षण करण्यासाठी जमेल त्या प्रत्येक पर्यायाचा विचार करत आहे. जेणेकरून ते कायम राखले जातील."

DRPPL च्या सूत्रांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, "इथल्या उत्तम पायाभूत सुविधा व्यवसायांना विस्तारण्यास अधिक सक्षम करतील. तर कौशल्य-विकास केंद्र या लोकांना नवीन ज्ञान मिळवण्यास, शिकण्यास आणि त्यांच्या उत्पन्न क्षमतेत वाढ करण्यास मदत करतील. याशिवाय, या सगळया व्यवसायांना पाच वर्षांसाठी SGST परतावा दिला जाईल. ज्यामुळे त्यांच्या वाढीला आणि शाश्वततेला आणखी पाठिंबा मिळेल.

# राष्ट्रीय एकात्मतेची भावना असली पाहिजे !



**प्रविण बागडे**

भारतीय संघराज्याच्या राजभाषेत 14 सप्टेंबर 1949 रोजी घटना समितीने ऐतिहासिक निर्णय घेऊन हिंदी भाषेला राजभाषेचा सन्मान दिला. त्यामुळे दरवर्षी 14 सप्टेंबर हा दिवस 'हिंदी दिन' म्हणून साजरा केला जातो. राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये सध्या बावीस भाषांना राष्ट्रभाषा म्हणून दर्जा देण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या 17 व्या भागात जी कलमे नमूद आहेत, त्यानुसार हिंदी ही भारतीय संघराज्याची राजभाषा असून, तिची लिपी 'देवनागरी' असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. 14 सप्टेंबर पासून एक आठवडा 'हिंदी सप्ताह' साजरा केला जातो. या आठवड्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. हा कार्यक्रम शाळेत आणि कार्यालयात आयोजित केला जातो. केवळ हिंदी दिवसापुरते मर्यादित न राहता लोकांमध्ये हिंदी भाषेच्या विकासाची भावना वाढविणे हा त्याचा मूळ उद्देश आहे.

1918 मध्ये गांधीजींनी हिंदी साहित्य संमेलनात हिंदीला राजभाषा बनवण्याची मागणी केली होती. गांधीजींनी तिला जनमानसाची भाषाही म्हटले आहे. 1949 मध्ये, स्वतंत्र भारताच्या अधिकृत भाषेच्या प्रश्नावर बराच विचारविनिमय केल्यानंतर, 14 सप्टेंबर 1949 रोजी हा निर्णय घेण्यात आला, ज्याचे भारतीय राज्यघटनेच्या 17 व्या अध्यायामध्ये वर्णन केले आहे. संघाची अधिकृत भाषा हिंदी आणि लिपी देवनागरी असेल. संघाच्या अधिकृत हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या अंकांचे स्वरूप आंतरराष्ट्रीय स्वरूप असेल. हा निर्णय 14 सप्टेंबर रोजी घेण्यात आला, हा दिवस हिंदी साहित्यिक व्योहर राजेंद्र सिंह यांचा 50 वा वाढदिवस होता, म्हणूनच हा दिवस हिंदी दिवसासाठी सर्वोत्तम मानला जात होता. मात्र राष्ट्रभाषा म्हणून तिची निवड करून अमलात आणल्यावर अहिंदी भाषिक राज्यातील लोकांनी विरोध सुरू केला आणि इंग्रजीलाही राजभाषेचा दर्जा द्यावा लागला. त्यामुळे हिंदीवरही इंग्रजी भाषेचा प्रभाव पडू लागला.

वर्षातून एकदा लोकांना जाणीव करून देणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे की, जो पर्यंत ते हिंदीचा पूर्ण वापर करत नाहीत तो पर्यंत हिंदी भाषेचा विकास होऊ शकत नाही. या दिवशी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये इंग्रजी ऐवजी हिंदीचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो. याशिवाय जो वर्षभर हिंदीत चांगली विकासकामे करतो आणि आपल्या कामात हिंदीचा चांगला वापर करतो, त्याला पुरस्काराने गौरविण्यात येते. बरेच लोक त्यांच्या सामान्य बोलण्यात इंग्लिश भाषेतील शब्द किंवा इंग्रजी देखील वापरतात, ज्यामुळे हिंदीचे अस्तित्त्व हळूहळू धोक्यात येत आहे. दूरचित्रवाणी पासून शाळांपर्यंत आणि सोशल मीडियापासून खाजगी तांत्रिक संस्था आणि खाजगी कार्यालयांपर्यंत सर्वच गोष्टींवर इंग्रजीचे वर्चस्व कायम आहे. यावरून असे दिसते की, त्यांची मातृभाषा हिंदी हळूहळू कमी व्हावी आणि नंतर दशकांनंतर नामशेष होऊ नये. आपल्या मातृभाषेला आपल्या जीवनात लहानसहान प्रयत्नांनी आवश्यक स्थान दिले नाही तर ती इतर भाषांच्या स्पर्धेत खूप मागे पडेल. वाराणसी येथे असलेली जगातील सर्वात मोठी हिंदी संस्थाही आज अतिशय जीर्ण अवस्थेत आहे. या कारणास्तव या दिवशी सर्वांना विनंती आहे की त्यांनी फक्त त्यांच्या बोलल्या जाणाऱ्या भाषेत हिंदीचा वापर करावा. याशिवाय लोकांना त्यांचे विचार वगैरे हिंदीत लिहिण्यास सांगितले जाते. हिंदी भाषेत लिहिण्याची साधने फार कमी लोकांना माहिती असल्याने या दिवशी हिंदी भाषेतील लेखन, तपासणे आणि शब्दकोश याबद्दल माहिती दिली जाते. हिंदी भाषेच्या विकासासाठी काही लोकांनी काम केल्याने फारसा फायदा होणार नाही. त्यासाठी सर्वांना संघटित होऊन हिंदीच्या विकासाला एका नव्या वळणावर घेऊन जावे लागेल. हिंदी भाषेच्या विकासासाठी आणि ती नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी हे आवश्यक आहे. हिंदी दिवसात अनेक कार्यक्रम होतात. या दिवशी विद्यार्थ्यांना हिंदीचा आदर करण्यास आणि दैनंदिन व्यवहारात हिंदीचा वापर करण्यास शिकवले जाते. ज्यामध्ये हिंदी निबंध लेखन, वादविवाद, हिंदी टंकलेखन स्पर्धा इ. हिंदी दिनानिमित्त लोकांना हिंदीसाठी प्रेरित करण्यासाठी भाषा सन्मान सुरू करण्यात आला आहे. हिंदी भाषेचा लोकांमध्ये वापर आणि उन्नतीसाठी विशेष योगदान देणाऱ्या देशातील अशा व्यक्तिमत्त्वाला दरवर्षी हा सन्मान देण्यात येणार आहे. यासाठी एक लाख एक हजार रुपये मानधन म्हणून दिले जाते. हिंदी भाषेतील निबंध लेखन स्पर्धेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी हिंदी भाषेच्या विकासासाठी आणि विस्तारासाठी अनेक सूचनाही प्राप्त होत आहेत. पण दुसऱ्या दिवशी सर्वजण हिंदी भाषा विसरतात. आणखी काही दिवस हिंदी भाषा लक्षात ठेवा, यासाठी राष्ट्रीय भाषा सप्ताह सुध्दा आयोजित करण्यात येतो. त्यामुळे ते वर्षातून किमान आठवडाभर राहते.

भाषिकांच्या संख्येनुसार इंग्रजी आणि चिनी भाषांनंतर हिंदी ही जगातील तिसरी मोठी भाषा आहे. पण नीट समजणाऱ्या, वाचणाऱ्या आणि लिहिणाऱ्यांमध्ये ही संख्या फार कमी आहे आणि ती कमी होत चालली आहे. यासोबतच इंग्रजी शब्दांचाही हिंदी भाषेवर मोठा प्रभाव पडला असून अनेक शब्द प्रचलित होऊन त्यांची जागा इंग्रजी शब्दांनी घेतली आहे. त्यामुळे भविष्यात ही भाषा नामशेष होण्याची शक्यताही वाढली आहे. या कारणास्तव ज्यांना हिंदीचे ज्ञान आहे किंवा हिंदी भाषा जाणते, अशा लोकांना त्यांच्या हिंदीबद्दलच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो, जेणेकरून ते सर्व त्यांचे कर्तव्य पार पाडू शकतील आणि हिंदी भाषेचे भविष्य घडवू शकतील. ते विलुप्त होण्यापासून वाचवा. मात्र जनता आणि सरकार दोघेही याबाबत उदासीन दिसतात. हिंदी तिच्याच घरात दासी म्हणून राहते. हिंदी ही अद्याप संयुक्त राष्ट्रांची भाषा बनलेली नाही. योगाला 177 देशांचा पाठिंबा मिळाला असे म्हणणे उपरोधिक ठरेल, पण 129 देशांमध्ये हिंदीसाठी काय जमवता येत नाही? त्याची अशी अवस्था झाली आहे की, हिंदी दिवसाच्या दिवशीही ट्विटरवर अनेकांना हिंदीत बोला असे शब्द वापरावे लागत आहेत. शेवटी हेच सांगावसे वाटते की, हिंदीला तूच्छ लेखु नका, तीही देशातील प्रमुख व राष्ट्रभाषा आहे. हिंदीला विरोध करुन आपण काहीही साध्य करु शकत नाही. तेव्हा हिंदी राष्ट्रभाषा म्हणुन बंधनकारक करावी. हा देश माझा आहे, ही आपुलकीची भावना ठेवायला शिका. देशावरचे तुमचे प्रेम, सांमजस्य, सहकार्य, राष्ट्रपुरुषांचे पुण्यस्मरण इत्यादि तऱ्हेने प्रत्यक्षात कृतीत उतरवा व सतत राष्ट्रीय एकात्मेची भावना आपल्या मनात प्रज्वलित करा सर्वांना हिंदी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# CWAS संस्था करणार HDFC च्या CSR निधीमधून पिण्याच्या पाण्याची शाश्वत उपाययोजना...

## जिल्हा परिषद पालघर आणि CWAS संस्थेमध्ये झाला सामंजस्य करार

**पालघर** - जिल्हा परिषद पालघर च्या सहकार्याने HDFC बँकेच्या सीएसआर निधी मधून CWAS (centre for water and sanitation) संस्था पालघर जिल्ह्यातील पालघर डहाणू आणि मोखाडा तालुक्यातील गावांमध्ये पिण्याचे पाणी आणि कचरा व्यवस्थापन सेवा सुधारण्यासाठी तीन वर्षाच्या कालावधीसाठी काम करणार आहे. या बद्दलचा सामंजस्य करार आज दिनांक १३/९/२०२४ जिल्हा परिषद पालघर आणि CWAS मध्ये करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी या करारावर सही करून सामंजस्य करार केला आहे




प्रकल्प संचालक पाणी व स्वच्छता धनराज पांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, गटविकास अधिकारी नरेंद्र रेवंडकर, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा पाध्ये, यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद पालघर बिरसा मुंडा सभागृह येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

जिल्ह्यात काही भागांमध्ये पाणीटंचाई चा प्रश्न असून CWAS संस्थेने पालघर जिल्ह्याची आणि त्यातील तीन तालुक्यांची यासाठी निवड केली याबद्दल मी संस्थेचे आणि एचडीएफसी चे मनापासून आभार मानतो तसेच यासाठी जिल्हा परिषदेचे जे काही सहकार्य लागेल ते पूर्ण सहकार्य तीन वर्षात जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल असे प्रतिपादन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी केले.

एचडीएफसी च्या सीएसआर निधीमधून पहिल्यांदाच इतका मोठा कार्यक्रम हाती घेत असून काही गोष्टींची पडताळणी करून पालघर जिल्हा यासाठी निवडण्यात आला असे यावेळी एचडीएफसी च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

संस्थेचे प्रमुख दिनेश मेहता यांनी तीन वर्षात पालघर मध्ये पिण्याच्या पाण्याच्या शाश्वत उपायांवर प्रभावीपणे काम करण्यात येईल असे सांगितले.

यावेळी तयार करण्यात आलेल्या आराखड्याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

# गौरी-गणपती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांकडे भाविकांचा ओघ

**ठाणे :** श्रीसह गौरी विसर्जनाच्या सहाव्या दिवशी ठाणे महापालिका क्षेत्रातील विसर्जनस्थळांवर एकूण १४३९९ गणेश मूर्ती तसेच ११४७ गौरी मूर्ती अशा एकूण १५५४६ मूर्तींचे सुव्यवस्थित नियोजनात विसर्जन संपन्न झाले. त्यात १०९ सार्वजनिक मंडळाच्या गणेश मूर्तींही होत्या. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची परंपरा यशस्वीपणे राबविणाऱ्या ठाणे महापालिकेच्यावतीने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांनी सहा दिवसांच्या गणेश मूर्तींचे व गौरी मूर्तींचे विसर्जन केले.

महापालिकेने तयार केलेल्या विसर्जन व्यवस्थेला ठाणेकर नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार मानले आहेत. प्रत्यक्ष विसर्जनाच्या ठिकाणी महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी पोलीस व स्वयंसेवकांच्या साथीने विसर्जन व्यवस्थेचे नियोजन केले.

**भाविकांनी २५९ मूर्ती स्वीकार केंद्रात दिल्या**

महापालिकेच्या एकूण १० ठिकाणी असलेल्या गणेश मूर्ती स्वीकार केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण २५९ गणेश मूर्तींचे महापालिकेच्यावतीने स्वीकृती केंद्राच्या जवळच्या कृत्रिम तलावांमध्ये विधिवत विसर्जन करण्यात आले.

**१३ टन निर्माल्य भक्तांनी केले दान**

सहा दिवसाच्या गणेश मूर्ती व गौरी मूर्ती विसर्जनादरम्यान सुमारे १३ टन निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे. दीड दिवसाच्या गणेश मूर्ती विसर्जनावेळी सुमारे १२ टन निर्माल्य संकलन झाले होते.

**पाचव्या दिवशी ७०९६ मूर्तीचे झाले विसर्जन**

ठाणे महापालिका क्षेत्रात पाचव्या दिवशी ७०९६ गणेश मूर्तीचे विसर्जन झाले. त्यात, ५८ सार्वजनिक मंडळांच्या मूर्तीचा समावेश होता.

# भिवंडीत गौरी गणपती विसर्जन उत्साहाने साजरा तर पालिका प्रशासनातर्फे चांगली व्यवस्था

## ५१४४ घरगुती, १२९ सार्वजनिक गणेश.१६५ गौरी, मूर्तींचे विसर्जन, ८५ गणेश मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जन







**भिवंडी** - भिवंडी गौरी गणपती विसर्जन फार उत्साहात करण्यात आले शहरातील मुख्य विसर्जन घाटांवर प्रभाग समिती क्रमांक एक अंतर्गत सर्व घाटांवर १०८९ घरगुती, सार्वजनिक ३४, गौरी १०५, कृत्रिम तलावात पाच, तर प्रभाग समिती क्रमांक दोन अंतर्गत भादवड घाटावर ८४७ घरगुती, २० सार्वजनिक, ४५ गौरी आणि कृत्रिम तलावात १५, प्रभाग समिती क्रमांक तीन अंतर्गत वराळदेवी परिसरात घरगुती २७५२, सार्वजनिक ६९, गौरी ११, कृत्रिम तलाव ३२, प्रभाग समिती क्रमांक चार अंतर्गत घरगुती ४०३ सार्वजानिक ६, कृत्रिम तलावात सहा, समिती क्रमांक पाच येथे दोन कृत्रिम तलाव तयार करण्यात होते त्यामध्ये २७ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

सर्व विसर्जन घाटांवर पालिका आयुक्त अजय वैद्य, तसेच उपायुक्त नयना ससाणे यांनी भेटी देऊन सर्व घाटावरील विसर्जनाचे पाहणी केली. सर्व घाटांवर पालिकेतर्फे वाहन वाहनाचे चांगली सोय करण्यात आली होती, जीवन रक्षक पथक त्याचबरोबर क्रेनची व्यवस्था, तराफे तसेच सर्व घाटांवर नियंत्रण कक्ष तयार करण्यात आले होते. पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी स्वतः सर्व घाटांवर भेट देऊन प्रत्यक्ष विसर्जनाची पाहणी केली व गणेश भक्तांना कोणत्या प्रकारची अडचणी येणार नाहीत या कामी सर्व प्रभाग अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख यांना सूचना दिल्या. एकूण शहरात एकूण घरगुती ५१४४ सार्वजनिक १२९ गौरी १६५ अशा गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. ८५ गणेश भक्ताने कृत्रिम तलावाचा वापर केला.

# जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागातील कामवाटप झाले आता ऑनलाईन

## महाराष्ट्रात पहिल्यांदाच जिल्हा परिषद ठाणे मार्फत पेमेंट गेटवेचा वापर

**ठाणे** - जिल्हा परिषदे मार्फत सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांना बांधकाम विभागातील १० लाखाच्या आतील विकास काम विनास्पर्धा ऑनलाईन लॉटरी पद्धतीने बी. जे. हायस्कूल येथे (दि.१३ सप्टेंबर) आज वाटप करण्यात आले. सन २०२४-२५ या वर्षातील १६६ विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी तंत्रज्ञानाची जोड घेऊन आज विकास कामाचे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आले. यामार्फत काम वाटप आणि आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे करण्याच्या उद्देशाने कामकाज करण्यात आले आहे. पुढील कामवाटप नियोजन ऑनलाईन लॉटरी पद्धतीने फेसबुक, युट्यूब दूरदृश्यप्रणाली द्वारे



देखील (लाईव्ह) करण्यात येईल. विकास कामांना गती मिळण्यासाठी सुरूवात उत्तम झाली असून काम देखील उत्तम पद्धतीने व्हावी अशी अपेक्षा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी व्यक्त केली. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून कामवाटप, वेळेची बचत, पारदर्शकता आणण्यासाठी मोलाचं आहे. कामवाटप ऑनलाईन पद्धतीने राबवणारी महाराष्ट्रातील ७ वी जिल्हा परिषद असून पेमेंट गेटवे वापर करणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद ठाणे आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामांना गती मिळणार असून लॉटरी पद्धतीने काम मिळालेल्या सर्वांचे अभिनंदन, असे प्रास्ताविक करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी मार्गदर्शन केले.यावेळी कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण, उप कार्यकारी अधिकारी सुनिल बच्छाव, आरेखक संजीव यशवंत, बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते. यापूर्वी हि प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने कामाच्या चिठ्या काढून लॉटरी पद्धतीन राबविण्यात येत होती. कामांचे विभाजन योग्य पध्दतीने करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून १ कोटी रक्कमेची काम ठेकेदाराने पुर्ण केल्यानंतर पुढील काम नवीन ठेकेदारास देण्यात येणार आहे.

# युवासेना कोपरी विभागाच्या वतीने गणेशभक्तांसाठी नाश्त्याची व पाण्याची सोय..

## युवासेना कोपरी विभागाचा स्तुत्य उपक्रम

**ठाणे -:** युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य समन्वयक युवासेना स्वप्निल लांडगे, उपाध्यक्ष लोकसभा क्षेत्र हेमंत पमनानी , कोपरी पाचपाखाडी विधानसभा क्षेत्र ऋषिकेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरी पाचपाखाडी विधानसभा समन्वयक प्रतिक जितेंद्र गाढवे, व उपसमन्वयक विधानसभा जितेश तरे यांच्या माध्यमातून ठाण्यातील कोपरी स्व. नारायणराव कोळी चौक परिसरात गणेशभक्तांसाठी मोफत नाश्ता व पाण्याची सोय करण्यात आली होती. गणेश चतुर्थीला घरोघरी विराजमान झालेल्या लाडक्या गणपती बाप्पाला व मंगळवारी माहेरवाशीण म्हणुन मुक्कामी आलेल्या गौरी मातेला गुरुवारी मोठ्या भक्तीभावाने निरोप दिला. ठाण्यातील कोपरी परिसरातील चेदंणी कोळीवाडा विसर्जन घाटावर मोठ्या संख्येने गणेश भक्त विसर्जनासाठी येत असतात, तसेच मोठ्या संख्येने भाविक गणरायाचे व गौरीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करित असतात , नागरीकांची गैरसोय होऊ नये यासाठी नाश्ता व पाण्याची सोय युवासेनेच्या वतीने करण्यात आली होती. यावेळी मोठ्या संख्येने



भाविकांनी गर्दी केली. याप्रसंगी कोपरी पाचपाखाडी विधानसभा समन्वयक प्रतिक जितेंद्र गाढवे यांनी सांगीतले कि, युवासेनेच्या वतीने कोपरी विभागात सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत, नवीन पदाधिकारी युवासेनेत दाखल झाल्याने उर्जा मिळाली असून येणाऱ्या काळात विविध समाजपयोगी उपक्रम राबवून जास्तीत जास्त लोकांपर्यंत कसं पोहचता येईल यासाठी आमचा प्रयत्न असणार असल्याच सांगीतले. तर या उपक्रमासाठी देवेश खांबल, शौनक तळकर, तेजस कुबळ, विप्रेश मुरुडकर तसेच सर्व पदाधिकाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

# राहुल गांधींच्या आरक्षणविरोधी वक्तव्यावर भाजपाचे 'कॉंग्रेस हटाओ, आरक्षण बचाओ'..

## भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वात ठाण्यात आंदोलन

**ठाणे :-** दलित व आदिवासी समाजाला दिलेल्या आरक्षणाविरोधात वक्तव्य केल्याप्रकरणी कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या निषेधार्थ भाजपा ठाणे शहर जिल्ह्यातर्फे 'कॉंग्रेस हटाओ, आरक्षण बचाओ' आंदोलन करण्यात आले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कोर्टनाका येथील पुतळ्यासमोर भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले व आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात कॉंग्रेसचा धिक्कार करण्यात आला. तसेच कोणत्याही परिस्थितीत आरक्षण हिसकावू दिले जाणार नाही, असा इशारा आंदोलनाद्वारे देण्यात आला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने दिलेले आरक्षण हिसकावून घेण्याची मानसिकता कॉंग्रेसच्या नेत्यांची आहे. अमेरिकेतील दौऱ्यात कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षणविरोधी वक्तव्य केल्याबद्दल देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा ठाणे शहर जिल्ह्याच्या वतीने आज 'कॉंग्रेस हटाओ, आरक्षण बचाओ' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्त्यांसह नागरिक सहभागी झाले होते.

राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून कॉंग्रेसचा खरा चेहरा हा जनतेसमोर आला आहे, याकडे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी लक्ष वेधले. तर कॉंग्रेसच्या नेत्यांची कायम आरक्षणविरोधी मानसिकता राहिली असल्याची टीका आमदार संजय केळकर यांनी केली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले व भाजपाचे आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात माजी नगरसेवक मुकेश मोकाशी, माजी नगरसेविका दीपा गावंड, जिल्हा सरचिटणीस मनोहर सुगदरे, सचिन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विक्रम भोईर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा स्नेहा पाटील, विद्या शिंदे, सुरेश पाटील, सचिन केदारी, अल्केष कदम, राकेश जैन, वृषाली वाघुले यांच्यासह विविध मंडलांचे अध्यक्ष व पदाधिकारी आदींसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कथोरेंना कोंडीत पकडण्याचे सर्वपक्षीय प्रयत्न ?

**बदलापूर :** स्वतःच्या जनसंपर्क आणि राजकीय डावपेचांच्या कलेवर स्वतःचा प्रभाव तयार करणारे मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांच्यासाठी यंदाची विधानसभा निवडणूक खडतर असल्याची चर्चा रंगली आहे. स्वपक्षीय भाजपातून छुप्या कारवाया, महायुतीतील सहकारी पक्ष असलेल्या शिवसेना पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मागण्या आणि भूमिका यामुळे कथोरे यांना यंदाची निवडणूक



जड जाण्याची शक्यता व्यक्त होते आहे. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड विधानसभा मतदारसंघ गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने चर्चेत येतो आहे. मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार किसन कथोरे यांनी दहा वर्षांपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून भाजपात प्रवेश केला. त्यावेळी जागा धोक्यात होती हे कारण नव्हते. कारण कथोरे यांची स्वतःची मोठी राजकीय ताकद मतदारसंघात आहे.

मात्र तरीही त्यांनी भाजपचा पर्याय स्विकारला. त्यांच्याआधी कपिल पाटील यांनी भाजपात प्रवेश करत खासदारकीची निवडणूक जिंकली होती. दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत पाटील यांना थेट केंद्रीय पंचायतीराज राज्यमंत्रीपदाची संधी मिळाली आणि जिल्ह्यात तसेच मुरबाड विधानसभा मतदारसंघात संघर्षाला सुरूवात झाली. पाटील आणि कथोरे एकाच पक्षाचे असूनही एकमेकांना कोंडीत पडकण्याची संधी सोडत नव्हते. त्यात पाटील यांनी अनेकदा जाहीर वक्तव्ये करून कथोरे यांची कोंडी केली होती. माळशेजचा काचेच्या पुलाबाबतच उघड वक्तव्य, कथोरे यांच्या इतर मतदारसंघात दिल्या जाणाऱ्या निधीवरून थेट जिल्हा नियोजन समितीच्या बैठतीत आक्षेप घेणे असे अनेक प्रकार उघडकीस आले. त्यामुळे कथोरे आणि पाटील यांच्यातील दरी वाढत गेली. त्याचाच फटका पाटील यांना लोकसभा निवडणुकीत बसला. पाटील यांनी जाहिरपणे कथोरे यांना दोषी धरले. मध्यंतरीच्या काळात त्यांनी कथोरे यांच्याविरूद्ध निवडणुकीला उभे राहण्यापर्यंतची वक्तव्ये केली.





श्री गणरायांचे आगमन झाले आहे.
आपण सर्व बाप्पाच्या दर्शनाला नक्कीच जाणार, मग यावेळी फक्त दर्शन घेऊ नका तर तुम्हाला आवडलेल्या बाप्पाच्या प्रतिमेचा व देखाव्याचा फोटो क्लिक करून आम्हाला नक्की पाठवा.

गणपती बाप्पा मोरया

१. बाप्पाच्या सुखमयी दर्शनास नक्की जा. २. गणरायांच्या प्रतिमेचा (देखाव्यासह) छान छायाचित्र काढा.
३. आम्हांला व्हाट्सऍप (९७०२३८६११८) किंवा ईमेल (dailylokrakshanay@gmail.com) यावर पाठवा.
४. सोबत तुमचे नाव आणि मंडळाचे (सार्वजनिक असल्यास) किंवा परिवाराचे नाव (घरगुती असल्यास) आणि स्थानाचे नाव पाठवा.

97023 86118 | dailylokrakhshanay@gmail.com

# 15 ऑगस्टला प्रदर्शित झालेला चित्रपट आला OTT वर



विकी कौशल, तृप्ती डिमरी आणि एमी विर्क यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'बॅड न्यूज' चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. १९ जुलै रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचे दिग्दर्शन आनंद तिवारी यांनी केले होते. चित्रपटाची निर्मिती अमृतपाल सिंग बिंद्रा, अपूर्व मेहता आणि करण जोहर यांनी केली होती. यामध्ये नेहा धुपिया, अनन्या पांडे, नेहा शर्मा यांचे कॅमिओ आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ७६.७ कोटी रुपयांची कमाई केली होती.

विक्रांत मॅसी आणि दीपक डोबरियाल हे दोघे या क्राईम थ्रिलरमध्ये मुख्य भूमिकेत आहेत. यात दोघांचाही यापूर्वी कधीच न पाहिलेला अंदाज प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. हा चित्रपट आज १३ सप्टेंबर रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. आदित्य निंबाळकरने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. हा त्याचा पहिलाच चित्रपट आहे.

खऱ्या घटनांनी प्रेरित या चित्रपटात झोपडपट्टीतून अनेक मुलं बेपत्ता होतात, त्याचा शोध घेताना एक स्थानिक पोलीस अधिकारी धक्कादायक सत्यापर्यंत पोहोचते, असं दाखवण्यात आलं आहे. याची निर्मिती दिनेश विजान यांच्या मॅडॉक फिल्म्स आणि जिओ स्टुडिओने केली आहे.

**बर्लिन**

अपारशक्ती खुराना आणि इश्वाक सिंग यांच्या मुख्य भूमिका असलेला 'बर्लिन' चित्रपट आज (१३ सप्टेंबर रोजी) झी 5 वर प्रदर्शित झाला. या स्पाय थ्रिलर सिनेमाचे दिग्दर्शन अतुल सभरवालने केले आहे. १९९० च्या काळातील दिल्लीतील अधिकारी परदेशी गुप्तहेर असल्याच्या संशयावरून एका मूकबधिर तरुणाला (इश्वाक) अटक करतात, अशी चित्रपटाची कथा आहे. यात राहुल बोस, अनुप्रिया गोएंका, कबीर बेदी हे कलाकारही आहेत.

रेखा यांच्याबरोबरच्या नात्याबद्दल विचारल्यावर अमिताभ बच्चन म्हणाले होते, "ती माझी..."

**मिस्टर बच्चन**

रवी तेजा आणि भाग्यश्री बोरसे यांचा चित्रपट १५ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. एक महिन्यापेक्षा कमी काळातच हा चित्रपट ओटीटीवर रिलीज करण्यात आला आहे. हा चित्रपट १२ सप्टेंबरला नेटफ्लिक्सवर प्रदर्शित करण्यात आला. या सिनेमाचे दिग्दर्शन हरीश शंकर यांनी केले आहे. 'मिस्टर बच्चन' हा २०१८ मधील हिंदी चित्रपट 'रेड'चा रिमेक आहे. या चित्रपटाने जगभरातील बॉक्स ऑफिसवर फक्त १४.१९ कोटींची कमाई केली.

आर्याने निक्कीच्या थेट कानाखाली वाजवली! दोघींमध्ये जोरदार वाद; 'बिग बॉस' देणार शिक्षा; म्हणाले, "हे अतिशय निंदनीय..."

**एमिली इन पॅरिस 4 भाग 2**

नेटफ्लिक्स शो 'एमिली इन पॅरिस' 4 चा दुसरा भाग आला आहे. नेटफ्लिक्सवरील हा शो खूपच लोकप्रिय आहे. दुसर्या भागात वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही आव्हानं पेलणाऱ्या एमिलीची कहाणी दाखवण्यात येणार आहे. चौथ्या सीझनचा दुसरा भाग गुरुवारी (१२ सप्टेंबर रोजी) प्रदर्शित झाला.

## स्टार अष्टपैलू खेळाडूचा पत्नीमुळे वाचला जीव, यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाली यशस्वी



आयर्लंड क्रिकेट संघाचा स्टार अष्टपैलू सिमरनजीत सिंग उर्फ सिमी सिंग याच्याशी संबंधित एक मोठी बातमी समोर आली आहे. नुकतेच तो यकृत निकामी झाल्याने त्रस्त असल्याचे उघड झाले होते. त्याला मेदांता, गुरुग्रामच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते आणि तो यकृत प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत होता. आता सिमी सिंगने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून चाहत्यांना एक मोठी अपडेट दिली आहे. ज्यामध्ये त्याने सांगितले की पत्नीमुळेच त्याचा जीव वाचला आहे, कारण यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया झाली आहे.

अष्टपैलू खेळाडू सिमी सिंगने आपल्या प्रकृतीबाबत अपडेट देताना सांगितले की, त्याची यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे. तो आता बरा होण्याच्या मार्गावर आहे. काही महिन्यांपूर्वी आयर्लंडमध्ये सिमी सिंगला अस्वस्थ वाटू लागले होते. त्यामुळे तो जूनमध्ये उपचारासाठी भारतात आला होता. आता त्याची पत्नी आगमदीपने त्याला यकृत दान केले आहे.सिमी सिंगने त्याच्या इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर करताना लिहिले, 'हाय फ्रेंड्स. एक अपडेट आहे, माझी यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया पूर्ण झाली आहे. ही १२ तासांची शस्त्रक्रिया होती आणि आता मी बरा होण्याच्या प्रक्रियेत आहे. चुकीची अँटिबायोटिक्स आणि स्टिरॉइड्स दिले गेले होते, ज्यामुळे माझे यकृत निकामी झाले होते. मी खूप भाग्यवान आहे की माझ्या पत्नीनेच माझ्यासाठी दाता बनून मदत केली. माझ्यासाठी संदेश आणि प्रार्थना करणाऱ्या मी प्रत्येकाचे आभार मानू इच्छितो.'

सिमी सिंग हा भारतीय वंशाचा खेळाडू आहे. पंजाबमध्ये जन्मलेल्या सिमी सिंगचे शालेय शिक्षण भारतात झाले. एवढेच नाही तर तो पंजाबकडून अंडर-१५ आणि अंडर-१७ संघात खेळला आहे. तो विराट कोहली, युजवेंद्र चहल आणि सिद्धार्थ कौल या खेळाडूंसोबत खेळला आहे.

## गॉगल घालून बॅटिंगला उतरला, भोपळ्यासह तंबूत परतल्याने श्रेयस अय्यर होतोय ट्रोल



श्रेयस अय्यरच दिवस खूप वाईट आहे. दुलीप ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात तो फ्लॉप ठरला होता. यानंतर बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी त्याची टीम इंडियात निवड झाली नाही. आता दुलीप ट्रॉफीच्या दुसऱ्या सामन्यातही हा खेळाडू सपशेल अपयशी ठरला. अशाप्रकारच्या अपयशानेही त्याची खिल्ली उडवली जात आहे. श्रेयस अय्यर शून्यावर बाद झाला म्हणून नव्हे तर त्याच्या शैलीमुळे खिल्ली उडवली जात आहे. वास्तविक, अय्यर पहिल्या डावात फलंदाजीला गॉगल घालून बॅटिंगला उतरला होता. श्रेयस अय्यरला खलील अहमदने बाद केले. या डाव्या हाताच्या गोलंदाजाने त्याला आकिब खानकरवी झेलबाद केले. तो सातव्या चेंडूवरच शून्यावर बाद झाला. त्यामुळे त्याची खिल्ली उडवली जात आहे. कारण चाहत्यांना त्याचे गॉगल घालून बॅटिंगला येणे आवडले नाही. काही चाहते म्हणाले की सूर्य त्या दिशेला नसतानाही त्याने गॉगल घातला होता. बरं, चाहते असेच ट्रोल करत राहतात पण श्रेयस अय्यर आऊट होणे, त्याच्यासाठी अजिबात चांगले नाही.

**विशाखापट्टणम कसोटीनंतर टीम इंडियातून बाहेर –**

भारत क विरुद्धच्या सामन्यातही अय्यर पहिल्या डावात ९ धावा करून बाद झाला होता. दुसऱ्या डावात त्याने अर्धशतक झळकावले असले तरी टीम इंडियात पुनरागमन करण्यासाठी अय्यरला सातत्यपूर्ण कामगिरी करावी लागेल. श्रेयस अय्यरच्या कसोटी कारकिर्दीबद्दल सांगायचे तर, त्याने यावर्षी इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिका खेळली होती. विशाखापट्टणम कसोटीनंतर त्याला टीम इंडियातून वगळण्यात आले होते.

**श्रेयस अय्यरची कसोटी कारकीर्द–**

अय्यरने आतापर्यंत १४ कसोटी सामने खेळले असून एक शतक आणि ५ अर्धशतकांच्या जोरावर त्याने ८११ धावा केल्या आहेत. आता अय्यर दीर्घ फॉर्मेटमध्ये कधी पुनरागमन करतो हे पाहणे बाकी आहे. टीम इंडियाला अजूनही न्यूझीलंडसोबत कसोटी मालिका खेळायची आहे. वर्षाच्या अखेरीस ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकांसाठी टीम इंडियात पुनरागमन करण्याचा अय्यरचा उद्देश असेल.

## "संग्रामची शक्ती खूप कमी पडली...", अरबाजच्या युक्तीचं आणि खेळाचं पहिल्यांदाच कौतुक



'बिग बॉस मराठी'चा पाचवा सीझन सध्या चांगलाच चर्चेत आहे. घरात होणाऱ्या भांडणांमुळे या सीझनची पहिल्या दिवसापासून सर्वत्र चर्चा रंगली आहे. विशेषत: अनेकजण निक्की-अरबाजच्या खेळीवर नाराज आहे. याबाबत रितेश देशमुखने देखील भाऊच्या धक्क्यावर दोघांनाही कडक शब्दांत समजूत दिली आहे. मात्र, त्याचा काहीच परिणाम झाल्याचं दिसत नाही. निक्कीने घरात केलेली चुकीची वक्तव्य, काम करण्यास दिलेला नकार या सगळ्या गोष्टींना अरबाज खतपाणी घालत असतो. त्यामुळे गेल्या भाऊच्या धक्क्यावर रितेशने अरबाजला 'निक्कीचा डोअरमॅट' असं देखील म्हटलं होतं.

अरबाज टास्कमध्ये दुसऱ्याचा विचार न करता अग्रेसिव्हरित्या खेळतो असा दावा घरातील अनेकांनी केला होता. त्यामुळे वाइल्ड कार्ड आलेल्या संग्राम चौगुलेने अरबाजला खुलं आव्हान दिलं होतं. कॅप्टन्सी उमेदवारीच्या टास्कमध्ये संग्राम – अरबाज भिडल्यावर नेमकं कोण बाजी मारणार याकडे सर्वांच लागलं होतं.

## दिनविशेष

**घटना**

२००८ : दिल्ली बॉम्बस्फोट या हल्ल्यात किमान ३० लोकांचे निधन तर १३० जण जखमी झाले.
२००३ : पं. दिनकर कैकिणी तानसेन ज्येष्ठ गायक, यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.
१९९६: श्रीमती इंदुमती पारिख ज्येष्ठ समाजसेविका, यांना श्रीमती जानकीदेवी बजाज पुरस्कार जाहीर.
१९९३ : ऑस्लो करार - इस्रायल आणि पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन यांच्यात हा करार झाला.
१९८९: आर्च बिशप डेस्मंड टुटू यांनी वर्णद्वेषी धोरणाला विरोध करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत विशाल मोर्चा काढला.
१९८५ : सुपर मारियो ब्रदर्स हा विडिओ गेम जपानमध्ये प्रकाशित झाला. गेम्सची सुपर मारिओ मालिका सुरू झाली.

**जन्म**

१९८०: वीरेन रास्किन्हा- भारतीय हॉकी खेळाडू
१९७६ : क्रेग मॅकमिलन - न्यूझीलंडचे क्रिकेटपटू
१९७१: गोरान इव्हानिसेव्हिच - क्रोएशियाचा लॉन टेनिसखेळाडू
१९६९: शेन वॉर्न - ऑस्ट्रेलियन लेगस्पिनर क्रिकेट खेळाडू
१९६७ : मायकेल जॉन्सन अमेरिकन धावपटू
१९६७: जेसन लुइस - इंग्रजी लेखक, शोधक आणि वल्ह्याच्या होडीतुन पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण करणारे पहिले व्यक्ती
१९५७: बॉन्गबॉन्ग मार्कोस फिलिपाइन्स देशाचे १७ वे राष्ट्राध्यक्ष
१९५१: साल्वा कीर मायार्दित - दक्षिण सुदान देशाचे पहिले अध्यक्ष
१९५० : वोझिमीर्झ सिमोझेविच पोलंड देशाचे ८वे पंतप्रधान

**मृत्यू**

२०२२: जसवंत बक्रानिया - भारतीय क्रिकेटपटू
२०२२ : एन. एम. जोसेफ भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (जन्म: १८ ऑक्टोबर १९४३)
२०२१: जॉर्ज वेन - अमेरिकन पियानोवादक आणि निर्माते, न्यूपोर्ट लोक महोत्सवाचे सहस्थापना (जन्म: ३ ऑक्टोबर १९२५)
२०२० : अजित दास भारतीय चित्रपट अभिनेते (जन्म: २० जानेवारी १९४९)
२०१२ : रंगनाथ मिश्रा - भारताचे २१ वे सरन्यायाधीश (जन्म: २५ नोव्हेंबर १९२६)
२००५ : ज्युलिओ सीझर टर्बे आयला कोलंबियाचे २५वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १८ जून १९१६)

## कमी खर्चात भुवया छान दाट व जाड करण्याचे १० सोपे उपाय




काळ्या आणि जाड भुवया तुमच्या सौंदर्यात भर घालतात. यामुळे तुमचे व्यक्तिमत्व वाढते. जर तुम्हाला तुमचा चेहरा थोडा वेगळा दिसावा असे वाटेत असेल तर तुमच्या भुवया जाड करा. नैसर्गिक पद्धतीने भुवया काळ्या आणि जाड करण्याकरता काही घरगुती उपाय करा.

एरंडेल तेल: भुवया जाड आणि दाट होण्यासाठी एरंडेल तेल लावा. एरंडेल तेल वापरल्याने केसांची वाढ सुधारते. याशिवाय भुवया मजबूत होतात. या तेलामध्ये फॅटी ॲसिड, जीवनसत्त्वे, अँटीऑक्सिडंट्स असे अनेक प्रकारचे गुणधर्म आढळतात आणि ते भुवयांना पोषण देते. याच्या मदतीने भुवया दाट करता येतात.

खोबरेल तेल: डोक्यावरील केसांप्रमाणेच भुवयांचे केसही दाट होण्यासाठी खोबरेल तेल लावा. खोबरेल तेलामध्ये अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे तुम्हाला तुमच्या भुवया दाट करण्यास मदत करू शकतात.

ऑलिव्ह ऑइल: जाड भुवया मिळविण्यासाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर केला जाऊ शकतो. यासाठी ऑलिव्ह ऑईलचे २ ते ३ थेंब घ्या. आता भुवयांवर लावा आणि सुमारे १०मिनिटे मसाज करा. यामुळे भुवयांची वाढ सुधारेल.

कांद्याचा रस: भुवया काळ्या आणि जाड करण्यासाठी कांद्याचा रस लावा. कांद्याचा रस भुवयांवर लावल्याने भुवया काळ्या आणि दाट होतात. यासाठी १ कांद्याचा रस काढा. आता भुवयांवर लावा आणि काही वेळ राहू द्या. नंतर चेहरा धुवा.

अंड्यातील पिवळ बलक: अंड्यातील पिवळ बलक फेटून ते तुमच्या भुवयांना लावा. पाण्याने धुण्यापूर्वी २०-३० मिनिटे तसेच राहू द्या. अंड्यातील पिवळ बलक प्रोटीनयुक्त असल्याने केसांच्या वाढीस मदत करू शकते.

मेथी दाणे: एक चमचा मेथी दाणे रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. सकाळी बियांची पेस्ट बनवून भुवयांना लावा. पाण्याने धुण्यापूर्वी ३० मिनिटे तसेच राहू द्या. मेथीच्या दाण्यांमध्ये प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड असते, जे केसांच्या वाढीस मदत करू शकते.पेट्रोलियम जेली: तुमच्या भुवयांना थोड्या प्रमाणात पेट्रोलियम जेली लावा आणि काही मिनिटे हलक्या हाताने मसाज करा.

## राशि भविष्य

**मेष** – कुटूंबातील काही सदस्यांच्या मत्सरी वागणुकीमुळे तुम्ही त्रासून जाल. परंतु, तुमचा राग अनावर होऊ देण्याची गरज नाही अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकेल. ज्यावर उपाय करता येत नाही ते शांतपणे सहन करावे. ग्रह नक्षत्रांची चाल तुमच्यासाठी आज चांगली नाही.

**वृषभ** – अति चिंतेने आणि तणावामुळे हायपरटेन्शन वाढेल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील. कुटुंबातील स्थिती आज तशी राहणार नाही जसा तुम्ही विचार करत आहे. आज घरात कुठल्या गोष्टीला घेऊन कलह होण्याची शक्यता आहे अश्या स्थितीमध्ये स्वतःला काबूत ठेवा.

**मिथुन** – विश्रांती, विरंगुळ्यासाठी तुमच्या प्रिय मित्रमंडळींसमवेत वेळ घालवा. जे लोक दुधाच्या व्यवसायाने जोडलेले आहे त्यांना आज आर्थिक लाभ होण्याची प्रबळ शक्यता आहे. दूरवरच्या नातेवाईकाकडून आलेल्या संदेशामुळे संपूर्ण कुटुंब उत्साही होईल.

**कर्क** – मानसिक, नैतिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण घेणेही संपूर्ण विकासासाठी आवश्यक ठरते. सशक्त मन हेच सशक्त शरीरामध्ये वास करते. नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल. आपल्या जीवनसाथी बरोबर चित्रपट पाहणे अथवा रात्रीचे जेवण करणे तुम्हाल शांतता, आराम मिळवून देईल आणि तुमचा मूड एकदम बहारदार राहील.

**सिंह** – धर्मपरायण व्यक्तीचे शुभाशिर्वाद तुम्हाल मन:शांती मिळवून देतील. वेळ आणि धन याची कदर तुम्ही केली पाहिजे अथवा येणारी वेळ समस्यांनी भरलेली राहू शकते. एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल.

**कन्या** – मित्र तुमच्या खुल्या मनाची आणि सहनशक्तीची परीक्षा पाहतील. पण तत्त्वांना शरण न जाता, विवेकी निर्णय घेण्याची खबरदारी घ्या. दिवसभर जरी तुम्ही धन कमावण्यासाठी प्रयत्न करत असाल परंतु, संध्याकाळी तुम्हाला धन लाभ होऊ शकतो.

**तूळ** – तुमचे मनमोकळे आणि निडर विचार तुमच्या मित्राला तुमचा गर्व आहे असे वाटून तो दुखावला जाईल. आज तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे. आज तुमच्या कृतीमुळे तुमच्यासोबत राहात असलेली व्यक्ती प्रचंड त्रासून जाईल.

**वृश्चिक** – तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. काही जणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल आणि तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल. आपण ज्याची काळजी करतो अशा व्यक्तीशी संवाद न झाल्यामुळे उदासवाणा दिवस.

**धनु** – तुम्हाला नुकताच नैराश्याचा झटका आला असेल तर योग्य पावले उचलली आणि आजच्या विचारांना प्राधान्य दिलेत तरी बरेच समाधान आणि आराम लाभेल. आपल्या पालकांनी केलेल्या मदतीमुळे आर्थिक अडचणींवर मात करणे शक्य होईल. प्रियजनांशी बोलताना वादग्रस्त विषय टाळा.

**मकर** – पटकन रागावणे तुम्हाला एखाद्या अडचणीत टाकू शकते. आपल्यासाठी पैसा वाचवण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते. आज तुम्ही योग्य बचत करण्यात यशस्वी व्हाल. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल. तुमच्या जीवनातील विमनस्कतेमुळे तुमच्या जोडीदारावरील तणाव वाढेल.

**कुंभ** – गरज नसलेल्या अशक्य गोष्टींवर विचार करण्यात तुमची शक्ती खर्च करू नका, त्यापेक्षा इतर योग्य कामासाठी तिचा वापर करा. आज तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे. तुमचे ज्ञान आणि विनोदबुद्धी यामुळे तुमच्या अवतीभवतीचे लोक प्रभावित होतील.

**मीन** – तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. आज तुम्ही घरातून बाहेर खूप सकारात्मकतेने निघाल परंतु, कुठल्या किमती वस्तूची चोरी होण्याने तुमचा मूड खराब होऊ शकतो.

# महाराणी येसूबाईंच्या स्फूर्ती स्थळासाठी श्री राजेशिर्के यांना वाढता पाठिंबा....




**रत्नागिरी** - छत्रपती शिवाजी महाराजांच्या संकल्पनेतील स्वराज्याच्या कुलमुखत्यार व छत्रपती धर्मवीर संभाजीराजे यांच्या पत्नी महाराणी येसूबाई यांचे शृंगारपूर येथे भव्य स्फूर्ती स्थळ व्हावे. या मागणीसाठी साताऱ्याचे माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के हे आक्रमक झाले आहेत . या मागणीसाठी दिनांक ९ सप्टेंबर पासून रत्नागिरी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करत आहेत .या आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळू लागलेला आहे.

स्वराज्यासाठी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली अठरापगड जातीच्या मावळ्यांनी आपल्या जिवाचे रान केले. त्यातील राजेशिर्के व इतर अनेक घराण्यांनी खुद्द शिवरायांची सोयरीक होती .यापैकीच एक राजेशिर्के घराण्याने आपले तन-मन धन अर्पण केले आहे . छत्रपती संभाजी महाराजांच्या पट्टराणी कुलमुखत्यार महाराणी येसूबाई यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर स्वराज्य संकटात असताना अत्यंत धीरोदात्तपणे या संकटाचा सामना केला .संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती शाहू महाराजांचे रक्षण केले .तब्बल २९ वर्ष त्या मुघल बादशाह औरंगजेबाच्या नजर कैदेत होत्या. पण कधी त्या डगमगल्या नाहीत. बंदीवासातही त्यांनी शाहू महाराजांवर उत्तम संस्कार केले. आणि कर्तुत्वान राजा घडवला. मात्र महाराणी येसूबाईंचे हे कर्तुत्व इतिहासाच्या पानांमध्ये झाकोळल्यासारखे गेले आहे . याची खंत आता नव्याने अभ्यास करणाऱ्या मावळ्यांना अस्वस्थ करत आहे.

या कर्तुत्ववान कुलमुखत्यार सम्राज्ञीचे समाधीस्थळ लोकस्मृतीतून नष्ट व्हावे. ही दुर्दैवाची बाब आहे . राजधानी सातारा येथील इतिहास संशोधकांनी येसूबाईंचे समाधीस्थळ शोधून काढली आहे. त्याच्या संवर्धनासाठीचा सातत्याने इतिहास प्रेमी व शिवप्रेमी मावळे पाठपुरावा करत आहेत.येसूबाई यांचे माहेर असलेले शृंगारपूर हे गाव देखील अजूनही दुर्लक्षित आहेत .कधीकाळी या गावात त्यांच्या पितृकुल राजेशिर्के घराण्याचा फार मोठा वाडा येथे होता, सरंजाम होता .परंतु या घडीला त्याचे भग्नावशेष मिळणे ही दुर्मिळ झाले आहे.

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे शिंदे गटाचे नेते शंभूराज देसाई आणि ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी घेतले दर्शन



**पुणे:** महाविकास आघाडी सरकारमधून एकनाथ शिंदे हे बाहेर पडून भाजपसोबत जाऊन एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले.या घटनेला जवळपास दोन वर्षाचा काळ होऊन गेला.पण या संपूर्ण कालावधीत ठाकरे गटाचे आणि शिंदे गटाच्या मंत्र्यांमध्ये तसेच नेत्यांमध्ये दररोज आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे. त्याच बरोबर या दोन्ही गटातील नेते आणि मंत्री एकाच व्यासपीठावर येण्याच आजवर टाळत आले आहे.पण आज पुणे शहरात गणेशोत्सवानिमित्त शिंदे गटाचे नेते मंत्री शंभूराज देसाई आणि ठाकरे नेते विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे या दोन्ही नेत्यांची श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरामध्ये दर्शना निमित्त एकाच वेळी भेट झाली.त्यावेळी दोघांनी हस्तांदोलन करीत गप्पा देखील मारल्या.त्यावेळी शंभूराज देसाई यांनी अंबादास दानवे यांना कुटुंबातील सर्व व्यक्तीची ओळख करून दिली. तर यावेळी अंबादास दानवे आणि शंभूराज देसाई दोघांनी गळाभेट घेतली. या गळाभेटी राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

## २१ सप्टेंबर रोजी जुहू बीच येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम

**मुंबई:** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी २१ सप्टेंबर रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू बीच, मुंबई येथे राज्य सरकार, स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सांगितले. दलामल हाऊस, नरीमन पॉईंट येथे आयोजित आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस निमित्ताने समुद्रकिनारा स्वच्छता मोहीमेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. श्री. दराडे म्हणाले, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली तसेच राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत सर्व १३ किनारी राज्यांमध्ये २१ सप्टेंबर, २०२४ रोजी (आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस) समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू बीच, मुंबई येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली असून त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार या मान्यवरांच्या उपस्थितीत समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या सर्व यंत्रणा, स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने ही मोहीम यशस्वी करण्यासाठी समन्वायाने कामे करावे, अशा सूचना श्री. दराडे यांनी दिल्या.

## विधानसभा निवडणुकीत स्पर्धा परीक्षार्थींचा कौल, या पक्षाला मोठा धक्का...

**नागपूर:** महाराष्ट्रात आता निवडणुका झाल्या तर काय होईल, महाविकास आघाडी जिंकेल की महायुती, शिंदे चालतील की उद्धव ठाकरे, अजित पवार चालतील की शरद पवार, भाजप की काँग्रेस अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या निवडणूक पूर्व सर्वेक्षणात शोधण्यात येत आहेत. असेच एक सर्वेक्षण ट्विटरवर करण्यात आले असून स्पर्धा परीक्षार्थींचा कौल जाणून घेण्यात आला. लोकसभेच्या निवडणुकीचा धुरळा खाली बसत नाही तोच महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणूक वातावरणाला सुरुवात झाली आहे. शिंदे सरकारने लाडकी बहीण योजना आणून लोकसभेला मविआ आणि महायुतीतील



दोन-तीन टक्क्यांच्या मतांचा फरक कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तर विरोधक ही योजना राज्याला कशी खड्ड्यात घालणार ते आपले सरकार आले की ते दीड देतायत आम्ही दोन हजार देऊ अशा दोन टोकाचा प्रचार करत सुटले आहे. लोकपोल या संस्थेनेही एक सर्वेक्षण केले असून २८८ मतदारसंघाताली सुमारे दीड लाख लोकांचे मत यासाठी विचारात घेण्यात आले आहे. राज्यात नोव्हेंबरमध्ये निवडणूक लागणार आहे. महायुती आणि मविआ अशी थेट लढत अपेक्षित आहे. तरीही प्रकाश आंबेडकर, संभाजी राजे छत्रपती, मराठा आंदोलक अशी तिसरी आघाडीची मोट बांधण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विरोधकांनुसार अजित पवारही त्या जहाजात असू शकतात. तरीही मविआ आणि महायुती असा थेट लढा पाहिला तर २८८ पैकी भाजपाप्रणित महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर मविआला १४१ ते १५४ जागा मिळताना दिसत आहेत. लोकपोलच्या सर्वेक्षणात महायुतीसाठी पर्यायाने भाजपाला धक्कादायक बाब म्हणजे ३८ ते ४१ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. तर मविआला ४१-४४ टक्के मते मिळताना दिसत आहेत.

## दंतचिकित्सकांना सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याला आव्हान



**मुंबई :** सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणाऱ्या दंतचिकित्सकांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी त्वचारोगतज्ज्ञांच्या संघटनेने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.पात्रता नसतानाही दंतचिकित्सकांकडून सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केली जात आहे, असा दावा द डायनॅमिक डर्मेटोलॉजिस्ट अँड हेअर ट्रान्सप्लांट असोसिएशनने जनहित याचिकेद्वारे केला आहे. तसेच, संघटनेने ६ डिसेंबर २०२२ रोजी भारतीय दंतवैद्यक परिषदेने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना आव्हान दिले आहे. या नियमांनुसार, देशभरातील मौखिक आणि मॅक्सिलोफेशियल चिकित्सकांना सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची परवानगी देण्यात आली.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर ही याचिका गुरूवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, नव्या भारतीय दंतवैद्यक आयोग कायद्यानुसार केंद्रीय दंतवैद्यक आयोग अस्तित्वात आहे की नाही याबाबत न्यायालयाने विचारणा केली. तसेच, त्याबाबतची भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. शिवाय, आयोग अस्तित्त्वात असल्यास आयोगाला प्रतिवादी करण्याचे आदेश दिले जातील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

त्याचवेळी, भारतीय वैद्यक परिषदेने देखील या मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता दिल्याकडे मुख्य न्यायमूर्तींनी लक्ष वेधले. तसेच, भारतीय वैद्यक परिषद ही एक घटनात्मक संस्था असून तिनेही दंतचिकित्सकांना सौंदर्य आणि केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे, हे दंचचिकित्सक ही शस्त्रक्रिया करण्यास सक्षम असतील तर त्यात गैर काय, असा प्रश्नही मुख्य न्यायमूर्तींनी केला.

## NITI Aayog report unveils plans to develop MMR into global fintech hub



**MUMBAI -** The Maharashtra government unveiled a NITI Aayog report on Thursday outlining plans to develop the Mumbai Metropolitan Region (MMR) into a global economic hub. The report aims to boost the region's economy from its current $140 billion GDP to a target of $300 billion. In this connection, a memorandum of understanding (MoU) between the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) and the World Economic Forum (WEF) was also signed on Thursday. This agreement was formalised in the presence of WEF Founder and Executive Chairman Prof Klaus Schwab. Chief Minister Eknath Shinde remarked on the MoU, emphasizing Mumbai's crucial role: "Mumbai is a lifeline for all of us. If Mumbai transforms, there will be significant improvements for Maharashtra and the entire country. The Economic Advisory Council has provided recommendations and plans for the state's development, and NITI Aayog's concept will strengthen this vision. NITI Aayog has outlined seven key recommendations to establish the MMR as a financial hub, with expectations that Mumbai will evolve into a global fintech capital. Our goal is for Maharashtra to contribute $1 trillion to the national GDP." Deputy Chief Minister Devendra Fadnavis added that the NITI Aayog report reinforces the steps towards achieving Maharashtra's $1 trillion economy goal.

## भटक्यांच्या शिक्षणासाठी सढळ हाताने मदतीची गरज

**छत्रपती संभाजीनगर :** जगण्यासाठी या गावाहून त्या गावाला जाणे हेच आयुष्य... बहुतांशी भिक्षा मागून पोट भरण्यासाठी कधी मरिआईचा गाडा डोईवर घेत हातातल्या ढोलक्यातून गबूगबू आवाज काढणाऱ्या महिला आणि अंगावर आसूड ओढणारे पुरुष असे कुटुंब... केवळ मरिआईचा गाडा ओढणारेच नाही तर नंदीबैलवाले, बहुरूपी, गोपाळ, कुडमुडे जोशी, मसनजोगी अशा किती तरी भटक्या जाती-जमातीतील मुले शिक्षणाच्या मूळ प्रवाहातून दूर राहिली आहेत.




या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, किमान प्राथमिक शिक्षणाच्या प्रवाहात ते यावेत यासाठी; या मुलांना स्वच्छता आणि शाळा चांगली असते हे समजावून सांगण्यासाठी 'भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान' राज्यभरात ५४ पालावरच्या शाळा चालवत आहे. या शाळेतील शिकविणाऱ्या कार्यकर्त्यांना मानधन तसेच इतर शैक्षणिक सुविधांसाठी दानशूर व्यक्ती आणि संस्थांकडून मदतीची गरज आहे.

भटक्या समाजात अनेक प्रकारची व्यसने दिसून येतात. त्यामध्ये महिला-पुरुष असा भेद दिसत नाही. त्यामुळे मुलांनी काय करावे, यापेक्षाही करू नये हे सांगणारी मंडळी भोवताली नसतातच. दिवसभर आई-वडील कामावर जात असतील तर त्यांच्या भोवताली खेळत राहणे, हाच मुलांचा भोवताल असतो. या मुलांच्या विशेषत: मुलींच्या आरोग्याचे प्रश्नही निराळे आहेत. अनेक रुढींनी जखडलेला समाज आहे. माणूस आजारी पडल्यावर दवाखान्यात औषधोपचार करण्याऐवजी नवस करणारी मंडळी अधिक आहेत. भटक्या समाजातील मुलांच्या आयुष्यातील शिक्षणाचे प्रश्न गंभीर आहेत, हे लक्षात आल्यानंतर 'भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान'च्या वतीने या मुलांच्या शिक्षणासाठी पालावरची शाळा किंवा अभ्यासिका काढण्याचा निर्णय काही वर्षांपूर्वी घेण्यात आला.

यापूर्वी तुळजापूर तालुक्यातील यमगरवाडी येथे पारधी समाजातील मुलांच्या शिक्षणाचा प्रयोग करण्यात आला होता. गिरीश प्रभुणे यांनी सुरुवातीच्या काळात, नंतर डॉ. अभय शहापूरकर यांनी या प्रकल्पातील मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. आता या प्रकल्पातील अनेक मुले मुली समाजात सन्मानाने जगू लागली आहेत. एक समाज मुख्य प्रवाहात येण्यापर्यंतचा प्रवास सुरू झाला असताना अन्य समाजातील मुलांसाठी कामाचा विस्तार करण्यात आला. यामध्ये विविध जातीजमातीमधील भटक्या समाजातील मुले काही तास अभ्यास करतात. या शाळांना अनुभव शाळाही म्हटले जाते. असे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना शैक्षणिक साहित्याची गरज आहे असे 'भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान'चे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर यांनी सांगितले. समाजातील प्रश्न सोडविताना त्यांचे ओळखपत्र बनविण्यापासून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम भटक्या विमुक्त प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येते.

## As Delhi CM Kejriwal gets bail, a look at what comes next

**Delhi -** "The CM does not have any portfolio so no significant change is expected there as far as the administration of the capital is concerned; but several important decisions are pending," a senior government official said."The CM does not have any portfolio so no significant change is expected there as far as the administration of the capital is concerned; but several important decisions are pending," a



senior government official said. (Express file photo) Six months after he was arrested by the Enforcement Directorate (ED) and subsequently by the Central Bureau of Investigation (CBI) in the Delhi excise policy case, Delhi Chief Minister Arvind Kejriwal will walk out of jail soon. The Supreme Court on Friday granted bail to the Aam Aadmi Party leader who was arrested by the CBI on June 26, while he was in the custody of ED. With bail conditions that do not give him complete freedom to perform his duties as Chief Minister, including that he cannot visit the Secretariat or the CM Office therein or sign any files other than those that have to be cleared by the Lieutenant Governor, officials said that the AAP government may encounter some problems, albeit small. "We are seeking a legal opinion on whether this means that the CM cannot hold meetings with officials. His not being allowed to go to the Secretariat is not really a problem since even in the past, several meetings have been held at his home. In any case, there is always the option of Cabinet decisions being finalised through circulation – which means that the file will be moved, comments sought and ultimately sent to the Lt Governor for approval as per requirement," a senior party leader said.

## PMPML electric bus catches fire in Pune, probe launched

**Pune -** An electric bus belonging to the Pune Mahanagar Parivahan Mahamandal Ltd (PMPML) caught fire in Pune on Thursday evening, the first such incident since 2018. PMPML has launched a probe into the incident.

The incident occurred at Kalubai Chowk on the Pune-Solapur Road. While the commuters escaped unhurt, the vehicle suffered major damages on its rear side.


"The fire started in the compressor of the bus and then spread. Some seats and rear portion (of the bus) were damaged," Ramesh Chavan, Chief Engineer, PMPML, said.

On Thursday evening, a few two-wheeler riders noticed smoke coming out of the rear side of the bus and alerted the driver. The driver quickly moved the bus away from the road and brought it to a halt. Even as the passengers were getting down, a fire broke out in the rear side of the bus.

The conductor and driver tried to douse the fire with the firefighting equipment installed in the bus and alerted the fire brigade. After the fire brigade arrived, the blaze was doused.

# धारावीत लवकरच पाच नमुना सदनिका

## पात्र रहिवाशांसह अपात्र, पात्र लाभार्थींना घरांविषयी माहिती



● मुंबई, (प्रतिनिधी) :

धारावी रिडेव्हलमेन्ट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत लवकरच रेल्वेच्या जागेवर पाच प्रकारच्या नमुना सदनिका (सॅम्पल फ्लॅट) उभारणार आहे. पुनर्विकासात पात्र रहिवाशांसह अपात्र आणि पात्र लाभार्थींना नेमकी कशी घरे देण्यात येणार याची कल्पना धारावीकरांना यावी यासाठी पाच नमुना सदनिका बांधण्याचा निर्णय 'डीआरपीपीएल'ने घेतला आहे. लवकरच या नमुना सदनिकांच्या बांधकामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. अपात्र रहिवाशांसाठी धारावीबाहेर ३०० चौरस फुटांचे घर काही शुल्क आकारून दिले जाणार आहे. तर पात्र झोपडीधारकाला ३५० चौरस फुटांचे घर मोफत देण्यात येणार आहे. त्याच वेळी चाळी, खासगी, सरकारी इमारतीमधील पात्र रहिवाशांसाठीही पुनर्विकासाअतंर्गत देय क्षेत्रफळानुसार घरांची बांधणी करण्यात येणार आहे. त्यानुसार धारावी पुनर्विकासाचा आराखडा पूर्ण झाला आहे. पात्र झोपडीधारकांसह इतरांची घरे नेमकी कशी असतील हे या आराखड्यात निश्चित झाले आहे. शक्य तितक्या लवकर धारावी पुनर्विकासाला सुरुवात करण्याचे 'डीआरपीपीएल'चे नियोजन आहे. त्यामुळे सर्वप्रथम धारावीतील रहिवाशांची घरे नेमकी कशी असतील याची कल्पना यावी यासाठी बीडीडी चाळ, रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकासाच्या धर्तीवर नमुना सदनिका तयार करण्यात येतील.

# पाच दिवसांत 1707 गणेश मूर्ती संकलित; नाशिक महापालिकेचा मूर्ती दान उपक्रम

● नाशिक, (प्रतिनिधी) :

**गणेशोत्सवात गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी महानगरपालिकेने राबविलेल्या उपक्रमांतर्गत पाच दिवसांत शहरात एकूण १७०७ मूर्तींचे संकलन करण्यात आले आहे. तसेच सुमारे चार मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले.**



गणेशोत्सव पर्यावरणस्नेही होण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेमार्फत अनेक वर्षांपासून मूर्ती दान उपक्रम राबविला जात आहे. शाडू मातीच्या मूर्तींची गणेशभक्तांनी स्थापना करण्यासाठी विभागीय कार्यालयात विक्रेत्यांना जागा उपलब्ध करण्यात आली होती.


पीओपी मूर्तींचे घरात विसर्जन करता यावे म्हणून मोफत स्वरुपात अमोनियम बायकार्बोनेट पावडर उपलब्ध केली जात आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने व नदी पात्रांचे प्रदूषण होऊ नये म्हणून राबविलेला मूर्ती दान उपक्रम आणि निर्माल्य संकलनास यंदाही गणेशभक्तांकडून प्रतिसाद मिळत आहे. विसर्जनासाठी शहरात विविध ठिकाणी कृत्रिम तलाव आणि निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कलश, निर्माल्य रथ यांची व्यवस्था केलेली आहे. पाच दिवसांच्या कालावधीत नागरिकांनी उत्स्फुर्तपणे मूर्ती दान करुन आणि निर्माल्य जमा करून सहकार्य केल्याचे महापालिकेने म्हटले आहे. सहा विभागातून आतापर्यंत एकूण १७०७ मूर्तींचे संकलन करण्यात आले. तसेच, सहा विभागातून विविध विसर्जन स्थळांवरून ३.८ मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले. पुढील काळातही गणेश भक्तांनी असाच प्रतिसाद द्यावा, अशी महापालिकेची अपेक्षा आहे. महापालिकेने राबविलेल्या मूर्ती दान उपक्रमात आतापर्यंत १७०७ मूर्तींचे संकलन करण्यात आले.

# मोदी सरकारचा मोठा निर्णय

## अंदमान-निकोबारच्या राजधानीचं नाव बदललं, पोर्ट ब्लेअर 'श्री विजयपुरम' नावाने ओळखलं जाणार

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी) :

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी (१३ सप्टेंबर) एक मोठी घोषणा केली. केंद्र सरकारने अंदमान निकोबार बेटांची राजधानी पोर्ट ब्लेअरचं नाव बदललं आहे. पोर्ट ब्लेअर बंदर हे आता 'श्री विजयपुरम' या नावाने ओळखलं जाणार आहे. अमित शाह यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "देशाला गुलामगिरीच्या सर्व प्रतीकांपासून मुक्त करण्याचा



पंतप्रधान नरेंद्र मोदींचा संकल्प आहे. या संकल्पापासून प्रेरित होऊन आज गृह मंत्रालयाने पोर्ट ब्लेअरचं नाव 'श्री विजयपुरम' असं ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. 'श्री विजयपुरम' हे नाव आपला स्वातंत्र्यलढा आणि त्यामधील अंदमान निकोबारचं योगदान दर्शवत राहील".

## लोकसभा निकालानंतर बहिणी लाडक्या झाल्या, पंधराशे रुपयात नाती निर्माण होत नाहीत - सुप्रिया सुळेंचा महायुतीवर हल्लाबोल

● सांगली, (प्रतिनिधी) :



लोकसभा निवडणुकीनंतर बहिणी लाडक्या झाल्या आहेत. पंधराशे रुपयांनी नाती निर्माण होत नाहीत. या नात्यावरून देखील महायुतीत श्रेयवाद होत असल्याची खोचक टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. आपलं सरकार नक्की येणार असल्याचे सुद्धा सुप्रिया सुळे म्हणाल्या. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बहिणीला काही नाही दिलं, तरी बहीण तुमच्यावर प्रेम असच करतात आणि दुर्दैव हे की या सरकारला लाडक्या बहिणीवरुनही श्रेयवाद सुरु आहे. जगातलं संस्कारांचं सगळयात पवित्र नातं हे बहिण भावाचं असत त्या पवित्र नात्यांमध्ये राजकारण सुरु आहे.

तासगाव तालुक्यातील सावळज गावचे सुपुत्र चंद्रकांत शिवाजी पाटील यांच्या अर्धपुतळ्याचे अणावरण खासदार सुप्रिया सुळे यांच्या पार पडले. अनावरण सोहळ्यासाठी जयंत पाटील, खासदार विशाल पाटील, आमदार सुमनताई पाटील, रोहित पाटील सुहास बाबर आदी नेते उपस्थित होते. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, तासगावमध्ये रोहित पाटील यांच्याकडे आपण नवीन चेहरा म्हणून पाहत आहोत. दरम्यान, स्वर्गीय आर आर पाटील यांच्या सुप्रिया सुळे यांनी आठवणी जागवल्या. सुप्रिया सुळे यांनी सांगितले की राज्यातील सर्वात मोठी पोलीस भरती आर आर पाटील यांच्या कार्यकाळामध्ये झाली. त्यामुळे आर आर आबा यांचे नाव सुवर्णाक्षरांनी नोंदलं जाईल. नेतृत्व संघर्षातून निर्माण होते असे सांगत त्यांनी वर्षभरापूर्वी झालेल्या पक्षांतर्गत घडामोडींकडे लक्ष वेधले. त्या म्हणाल्या की, एक वर्षांपूर्वी पक्ष गेला आणि चिन्ह सुद्धा गेलं. आम्हाला नवीन चिन्ह मिळेल की नाही याची सुद्धा खात्री नव्हती. मात्र, पांडुरंगाने तुतारी चिन्ह आम्हाला दिलं असल्याचं सुप्रिया सुळे म्हणाल्या. चिन्ह आज वाड्या-वस्त्यांवर पोहोचला असल्याचे त्यांनी नमूद केले.

# राहुल गांधी विरुद्ध भाजप आक्रमक,अमरावतीत पुतळा जाळला

● अमरावती, (प्रतिनिधी) :

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अमेरिकेतील आरक्षणासंदर्भातील विधानावर भाजपने आक्रमक पवित्रा घेतला असून शहरातील भाजपच्या नेत्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारून आणि प्रतिमा जाळून निषेध व्यक्त केला. येथील इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर राहुल गांधी यांच्या विरोधात आंदोलन करून घोषणाबाजी करण्यात आली. नंतर राहुल गांधी यांच्या प्रतिमेची जाळपोळ करण्यात आली. आरक्षणविरोधी भूमिका कॉंग्रेसने घेऊ नये, अन्यथा भाजप त्यांना फिरू देणार नाही, असा इशारा भाजप अनुसूचित जाती सेलचे सिद्धार्थ वानखडे यांनी दिला. यावेळी भाजपचे प्रवक्ते शिवराय कुळकर्णी उपस्थित होते. भारतात पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करु, असे राहुल गांधी म्हणाले होते. अमेरिकेत राहुल गांधींनी आरक्षणावरुन हे वक्तव्य केले,



मात्र त्यांच्या या वक्तव्याचे देशात आता पडसाद उमटत आहेत. सत्ताधारी पक्षाने त्यांना यावरून कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. राहुल गांधी यांच्यावर टीका करीत आहेत. आरक्षण विरोधी काँग्रेसचा चेहरा समोर आला असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मतांसाठी आरक्षणावरुन कसा खोटा नॅरेटिव्ह केला हे राहुल गांधींच्या वक्तव्यातून दिसले असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तर काँग्रेसची खरी आणि संविधान विरोधी भूमिका राहुल गांधींच्या तोंडून आता समोर आली आहे, अशी टीका भाजपच्या नेत्यांनी केली आहे. त्यांच्या वक्तव्याचा भाजपकडून राज्यभर निषेध केला जात आहे. दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या आरक्षणासंदर्भातील विधानाचा चुकीचा अर्थ काढून भारतीय जनता पक्ष त्यांच्या अंगभूत सवयीप्रमाणे खोटा प्रचार करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या जगातील सर्वश्रेष्ठ संविधानाला भाजपची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मानत नाही. आरक्षणाला संघाचा विरोध आहे, सरसंघचालक मोहन भागवत यांनीही आरक्षण संपुष्टात आणले पाहिजे, अशी जाहीर वक्तव्ये केलेली आहे. त्यामुळे भाजपाने कितीही खोटे बोलण्याचा प्रयत्न केला तरी ते त्यांचा आरक्षणविरोधी चेहरा लपवू शकत नाहीत, असे प्रत्युत्तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे.

# नाशिक शहरातील खड्डे दुरुस्तीची मनपा आयुक्तांकडून पाहणी

● नाशिक, (प्रतिनिधी) :

नाशिक शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांवरून सत्ताधारी आणि विरोधी अशा सर्वच राजकीय पक्षांनी आक्रमक भूमिका घेत या स्थितीला महापालिकेला जबाबदार धरले असताना खड्डे बुजविण्याच्या चाललेल्या कामांची मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी अकस्मात पाहणी केली. ही कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

दरवर्षी पावसाळयात खड्ड्यांमुळे वाहनधारकांसह नागरिकांना कमालीचा त्रास



सहन करावा लागतो. लहान-मोठे अपघात सातत्याने घडतात. हे वर्ष विधानसभा निवडणुकीचे असल्याने राजकीय पक्षांना याप्रश्नी भूमिका घ्यावी लागली. खड्ड्यांच्या विषयावर माजी महापौर दशरथ पाटील यांनी मागील वर्षी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. शिवसेना ठाकरे गटाने जेलरोडवरील खड्ड्यांकडे लक्ष वेधण्यासाठी बैलगाडी व घोडे रस्त्यावर आणले होते. मनसेने महापालिकेच्या प्रवेशद्वारावर ढोल वाजवत मडकी फोडली होती. या स्पर्धेत भाजपचे लोकप्रतिनिधी मागे राहिले नाहीत. त्यांनी मनपा आयुक्तांना धारेवर धरले होते.

मनपा आयुक्त डॉ. करंजकर यांनी रस्त्यांची डागडुजी करून खड्डे बुजविण्याचे निर्देश यापूर्वीच दिले आहेत. अनेक भागात ही कामे प्रगतीपथावर आहेत. आयुक्त करंजकर यांनी अकस्मात नवीन नाशिक, सिडको आणि सातपूर विभागात भेटी देत खड्डे दुरुस्ती, डागडुजीच्या कामांची पाहणी करीत माहिती घेतली.

# कोल्हापूर, सांगलीसाठी अखेर वंदे भारत मिळाली

## 16 सप्टेंबरपासून धावणार, कसं असेल वेळापत्रक?

● कोल्हापूर, (प्रतिनिधी) :

बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित आणि प्रदीर्घ संघर्षानंतर कोल्हापूरकरांसाठी वंदे भारतची मागणी पूर्ण झाली आहे. कोल्हापूर ते पुणे मार्गावर वंदे भारत 16 सप्टेंबरपासून धावणार आहे. गेल्या आठवडाभरापासून पुणे हुबळी वंदे भारतला प्रस्तावित कोल्हापूर थांबा झाल्यानंतर वाद वाढला होता. त्यानंतर कोल्हापूर सांगलीसह कर्नाटकमधील लोकप्रतिनिधी तसेच प्रवासी संघटनांनी हस्तक्षेप केल्यानंतर रेल्वे



मंत्रालयाकडून कोल्हापूर ते पुणे आणि हुबळी ते पुणे अशा दोन स्वतंत्र वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा कंदील दिला. येत्या सोमवारपासून म्हणजेच 16 सप्टेंबरपासून वंद भारत धावणार आहेत.

अशी धावणार कोल्हापूर-पुणे वंदे भारत

कोल्हापूर ते पुणे वंदे भारत सकाळी सव्वा आठ वाजता कोल्हापुरातून निघेल.

मिरजमध्ये 9 वाजता, सांगलीत सव्वा नऊ वाजता, किर्लोस्करवाडीत 9.42 मिनिटांनी कराडला 10.07, सातारा 10.47 आणि पुण्यात दीड वाजता पोहोचेल.

पुण्यातून परतणारी गाडी दुपारी सव्वा दोन वाजता सुटेल. साताऱ्यात 4.37 कराड 5.25, किर्लोस्करवाडीत 5.50, सांगली 6.18, मिरजेत 6.40 तर कोल्हापुरात 7.40 ला पोहोचेल.

### असे असेल वेळापत्रक?

- कोल्हापूर ते पुणे वंदे भारत प्रत्येक मंगळवार, शनिवार व सोमवारी धावणार
- पुणे ते कोल्हापूर वंदे भारत प्रत्येक बुधवार, शुक्रवार व रविवारी धावणार

# "राहुल गांधींबाबत मनोज जरांगे पाटील", पंकजा मुंडेंचं टीकास्त्र

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी) :

लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणासंदर्भात केलेल्या विधानाची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. अमेरिका दौऱ्यातील त्यांच्या या विधानावरून भारतीय जनता पक्षानं परखड शब्दांत टीका केली असून राहुल गांधींना लक्ष्य केलं आहे. एकीकडे केंद्रातील भाजपा नेते राहुल गांधींना या मुद्द्यावर लक्ष्य करत असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील भाजपा नेत्यांनीही राहुल गांधींवर टीका केली आहे. भाजपा नेत्या व विधानपरिषद सदस्य पंकजा मुंडे यांनी आज राहुल गांधींच्या विधानाविरोधातील भाजपाच्या आंदोलनात सहभाग घेतला. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्यावरही तोंडसुख घेतलं.

"काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत जे विधान केलं, त्यातून देशभरातील अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षण प्राप्त लोकांमध्ये प्रक्षोभ निर्माण झाला आहे. मी राहुल गांधींच्या विधानाचा निषेध करते. जोपर्यंत राहुल गांधी त्यांच्या विधानाबाबत सविस्तर भूमिका स्पष्ट करत नाहीत, तोपर्यंत आमचं आंदोलन प्रत्येकाच्या जनामतान, गल्लीबोलात सदैव चालू राहणार आहे", असं पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. भाजपा आमदार आशिष शेलार यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होते. "संविधानाचा त्यांनी जो अवमान केला, आरक्षण रद्द करण्याची



भाषा केली, ते आरक्षण ज्यांना मिळालं आहे, त्या वंचितांची ते जोपर्यंत क्षमा मागत नाहीत, तोपर्यंत आमचं आंदोलन चालू राहणार आहे. देशात लोकसभा निवडणूक चालू असताना भाजपाबाबत अपप्रचार करून, काँग्रेसनं आरक्षण रद्द करणार अशी भाषणं करून, लोकांना भूलथापा देऊन त्यांची मनं वळवण्याचा प्रयत्न केला होता. पण आज त्यांच्या मनातलं, त्यांच्या पोटातलं ओठात आलं आहे", अशा शब्दांत पंकजा मुंडेंनी राहुल गांधींना लक्ष्य केलं आहे.

"खरंतर आपल्या देशाची प्रतिमा, देशाबाहेर प्रत्येक पक्षाच्या, विचाराच्या, प्रत्येक जातीच्या, प्रत्येक धर्माच्या व्यक्तीने राखली पाहिजे. पण आपल्या देशाचा मान कमी करण्याचं काम राहुल गांधींनी त्या मुलाखतीत केलं आहे. भारतीय संविधानाचा अवमान त्यांनी करायला नको होता. या बाबतीत त्यांनी खुलासा करायला हवा. त्यांच्या मित्रपक्षांनी त्यांची भूमिका राहुल गांधींशी सहमत आहे का? याबाबत स्पष्ट खुलासा करायला हवा", असंही पंकजा मुंडे म्हणाल्या.

## "मोदींनी क्षमा मागितली, काँग्रेस नेते मागतील का?"

दरम्यान, छत्रपती शिवरायांचा पुतळा पडला, तेव्हा प्रचंड वेदना झाल्याचं नमूद करत पंकजा मुंडेंनी काँग्रेसला लक्ष्य केलं. "पुतळा पडला त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी धैर्य दाखवून माफी मागितली. छत्रपतींबाबतचं प्रेम त्या भावनेतून व्यक्त केलं. राहुल गांधींच्या विधानानंतर देशातील आरक्षणप्राप्त लोकांच्या मनात, अनुसूचित जाती-जमातींमध्ये आक्रोश निर्माण झाल्यानंतर काँग्रेस नेते आता माफी मागतील का?" असा सवाल पंकजा मुंडेंनी केला.